अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : १ दि. १८ - ३- २००५

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर शहराच्या पाणी पुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वारंवार येत असलेल्या नोटीसांबाबत ऑफिस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : अहमदनगर शहराच्या पाणी पुरवठयाच्या उच्चदाब विदयूत संचाचा विज पुरवठा खंडीत करण्याबाबत महाराष्ट्र विद्यूत मंडळाने आज दिनांक ७/३/२००५ रोजी इकडेस नोटीस पत्राव्दारे कळविलेले आहे. (सोबत महा.विद्यूत मंडळाचे नोटीसपत्र) दि.२८/२/२००५ रोजीही महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाने नोटीस देवून अहमदनगर महानगरपालिकेकडे नगर शहराच्या पाणी पुरवठयाचा उच्चदाब विदयूत संचाची दि.३१/१२/२००४ अखेर रुपये १२९४८.६२ लाख थकबाकी भरणेबाबत कार्यवाही करा,अन्यथा वीज पुरवठा खंडीत केला जाईल असे सुचीत केलेले होते.

सदयस्थितीत असलेली थकबाकी ही काही प्रमाणात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाची व काही प्रमाणात तत्कालीन नगरपालिकेची व पर्यायाने आताच्या महानगरपालिकेची आहे.या संदर्भात सर्व मान्य तोडगा काढण्यास्तव मा.शासन स्तरावर वेळोवेळी बैठका आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. व त्याप्रमाणात निर्णयही दिलेले होते. (सोबत बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.) परंतू या बैठकामधून थकबाकीबाबत सर्वमान्य तोडगा न निघाल्याने थकबाकीची रक्कम वाढत गेलेली आहे.

याचाच एक भाग म्हणून दि. १७/२/२००५ रोजी महाराष्ट्र शासनाचे मा.प्रधान सचीव, स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दालनात महाराष्ट्र विद्यूत मंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, व अहमदनगर महानगरपालिका, यांचे प्रतिनिधी समवेत बैठक आयोजीत करण्यात आलेली होती.सदर बैठकीत मा.प्रधान सचीव यांनी महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, यांनी एकत्र बसून थकबाकीचा वाद मिटवून थकबाकी भरण्यासंदर्भात सूचना दिलेल्या होत्या. या सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिकेने दि.२४/२/२००५ रोजी व दि. ४/३/२००५ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाचे अधीक्षक अभियंता, व इतर अधिका-यांसमवेत मा.आयुक्त, महानगरपालिका यांचे दालनात बैठक आयोजीत केलेली होती. सदर बैठकीस मा.महापौर व मा.सभापती, स्थायी समिती, हे ही हजर होते.सदर बैठकीत दोन्ही कार्यालयाकडील प्रलंबीत असलेल्या थकबाकीबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणेपूर्वीची वीजबीलांची सर्व थकीत रक्कम भरणेची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील.
२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने पूर्वी जी पाणी बीले दिलेली आहेत. त्यांच्या दरात सुधारणा करुन पुन्हा बीलाची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुधारीत करण्यात येईल.
३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने पूर्वी जी पाणी बीले दिलेली आहेत. त्यात प्रत्यक्ष मिळणारे पाणी व बिलात आकारण्यात आलेले पाणी यातील तफावत दुरुस्त करण्यात येवून बीलाची आकारणी करण्यात येईल.

वरील बैठकीत ठरल्याप्रमाणे अहमदनगर पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर म्हणजेच १/७/९९ नंतरची वीज बीलांची थकबाकी ही अहमदनगर महानगरपालिकेची राहील.

अहमदनगर महानगरपालिका जुन २००३ पासून वीज बीलाची दरमहाची देयके नियमीतपण

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडे अदा करीत असून ,१/७/९९ ते ३०/५/२००३ या कालावधीतील वीज बीलाची थकीत रक्कम रु.२७,४९,५०,७७०/- एवढी व्याज व विलंब आकार वगळून येत आहे.

मा.शासनाचे निर्णयानुसार सार्वजनिक नळ पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाने त्यांचे दिनांक २१/७/२००४ रोजीचे परिपत्रकाअन्वये जाहीर केलेल्या सार्वजनिक पिण्याच्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या वीज बिलांच्या थकबाकी बाबत सवलत देण्याची ''सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजीवनी'' योजना जाहिर केलेली आहे. मात्र महाराष्ट्र राज्य विदयूत मंडळाने जाहीर केलेली योजना नगरपालिकेसाठी असून त्यात महानगरपालिकांचा समावेश नाही.परंतू दिनांक १७/२/२००५ रोजी मा.प्रधान सचीव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई, यांचे दालनात थकबाकी संदर्भात झालेल्या मिटींगमध्ये मा.प्रधान सचीव साहेबांनी सदर योजना अहमदनगर महानगरपालिकेसाठी लागू राहील, व अहमदनगर महानगरपालिकेने त्याबाबत योग्य तो विचार करावा. असे सांगितलेले आहे.

सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजीवनी योजनेबाबत सविस्तर अहवाल ,मा.सर्वसाधारण सभा
(अंदाजपत्रकीय सन २००५-२००६ ) ठेवण्यात आलेला आहे.

येणेप्रमाणे महानगरपालिकेची कार्यवाही चालू आहे. परंतू ही थकबाकी भरणेस्तव महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाकडून वारंवार मागणी होत असून, थकबाकी न भरल्यास पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल. याबाबतच्या नोटीसा येत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेची विनाकारण बदनामी होत असून नागरीकांत असंतोषाचे वातावरण निर्माण होत आहे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, '' महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे या योजनेनुसार जर अहमदनगर महानगरपालिकेने लाभ घ्यावयाचा ठरविल्यास महानगरपालिकेस मुद्दलाच्या ५०% म्हणजेच रु.१३,७४,७५,३८५/- इतकी रक्कम १० समान हप्त्यात भरणा करावी लागेल. ही रक्कम भरणा केल्यास रु.३१,१०,८१,४०५/- इतकी थकबाकी महानगरपालिकेला माफ होईल. त्यामुळे ही योजना अहमदनगर महानगरपालिकेस अत्यंत लाभदायक आहे.

सन २००५-०६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी रु.५,००,०००/- कर्ज रुपाने उत्पन्न व रु.५,००,०००/- इतकी खर्चाची टोकण तरतूद करणेत आलेली आहे. एकूण रकमेचा विचार करता रु.१३,७४,७५,३८५/- इतकी रक्कम अंदाजपत्रकातून शिल्लक ठेवून योजनेचा लाभ घेणे अशक्य आहे. त्यामुळे अंदाजपत्रकात केवळ टोकण तरतूद केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विद्युत कनेक्शन बंद करण्याबाबत वेळोवेळी पत्र दिले जात आहेत. दिनांक ०९-०३-२००५ रोजी काळी वेळ विद्युत पुरवठा खंडीतही करणेत आला होता. अशा परिस्थितीत या योजनेचा लाभ घेण अवशयक झाले असून लाभ घेणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १० मधील कलम १०९, ११० मध्ये कर्ज उभारणीबाबतचे महानगरपालिकेचे अधिकार नमूद करण्यात आलेले आहेत. या प्रकरणात कर्ज घेणे व परतफेडीबाबत सर्व तरतूदी नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे मुख्य लेखा परिक्षकांचे अभिप्राय नमूद करुन विषय तातडीने महासभेपुढे घेण्यासाठी प्रस्तावित करणे उचित राहील. तरी मुख्य लेखा परिक्षक यांनी आपले अभिप्राय नमूद करुन फेरसादर करावे. ''

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, '' सार्वजनिक नळ पाणीपुरवठा संजीवनी योजनेचा लाभ घेतल्यास महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. तसेच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता एकूण रक्कम रु.१३,७४,७५,३८५/-  १० समान हप्त्यामधे भरावयाचे

आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण १०९ व ११० प्रमाणे कर्जाऊ रक्कम मा.शासनाच्या पूर्वमंजूरीने प्राप्त करुन घेता येईल.

तसेच सन २००५-२००६ चे अंदाजपत्रकातील तरतुदीमध्ये घेतलेल्या कर्जाची परतफेड करणेकरिता तरतूद करावी लागेल. सबब महानगरपालिका सभेपुढे प्रस्तावीत करुन निर्णय घेणे योग्य.''

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, '' सन ९९ नंतर नगरपालिका/महानगरपालिकेकडे पाणीपुरवठा योजना हस्तांतर झालेनंतरची विद्युत बील बाकी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणे आवश्यक आहे. प्रस्तावित जलसंजीवनी योजनेचा लाभ घेऊन थकीत विद्युत बिलाची रक्कम भरणेचे नियोजन करणेस हरकत नाही.''

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा), मुख्य लेखा परिक्षक व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

मा.खास सभेतील चर्चा :-

मा.श्री.कृ.द.जाधव - खास सभेचा उल्लेख केलेला आहे.नियम काय आहे.सभा कायदेशिर आहे काय ? फक्त खास सभेचे विषयच घ्यावयास पाहिजे.तसेच या सभेत मागील सभेचे कार्यवृत्त त्याचप्रमाणे दुखवटयाचे प्रस्ताव ठेवलेले नाही,त्यामुळे ही सभा बेकायदेशिर आहे असे वाटते.

महापौर - वीज पुरवठा बीला बाबत विशेष सभा घेतलेली आहे. महत्वाचे विषय घेतलेले आहे.सभा कायदेशिर आहे.

चर्चा पुढे चालू.

मा.श्री.त्रिपाठी - वीज बीला बाबतचा प्रश्न ३० वर्षापासुन चालु आहे.घाबरण्यांचे कारण नाही,मंत्रीस्तरावर बैठक घेण्यांत यावी.तत्पुर्वी २० लाख रु.वीजबील दरमहा भरण्यांचे ठरले होते.जीवन प्राधिकरण विभागाकडुन पाणीपुरवठा योजना ताब्यात घेतांना सावेडी भुयारी गटार योजना मार्गी लावण्यांबाबत ठरलेले होते. परंतु झाली नाही.सध्या कर्मचा-यांच्या पगाराला पैशे नसतात सदरचे पैशे भरण्यांसाठी कोठुन आणणांर त्याबाबत कमिटी नेमावी.कमिटी नेमुन त्याबाबतचा निर्णय घेण्यांत यावा.

मा.श्री.नामदेव पवार - युतीच्या काळामध्ये झालेल्या मिटींगचे वेळी थकबाकीचे बील माफ केलेले होते.पेपरमध्ये तसे छापून आले होते. त्याबाबत पत्रव्यवहार केला आहे काय.

त्याबाबत इंजिनिअर श्री.निकम यांनी खुलासा केला.

श्री.निकम - मिटींगचे इतिवृत्त आपल्याकडे आहे.बील माफ केलेले नाही व बजेट तरतूद केलेली नाही.

मा.आयुक्त - बील माफ होण्यांचा प्रश्न नाही.प्रस्तावात स्पष्ट नमूद केले आहे.थकबाकी भरणें आवश्यक आहे.माफ झालेले नाही.

मा.श्री.नामदेव पवार - याबाबतचे पैसे कसे भरणांर काय पर्याय आहे,तरतुद काय आहे व ठराव काय घेणांर.

मा.श्री.दिपक सुळ - दि.१७-२-२००५ रोजी झालेल्या बैठकी प्रमाणे जीवन प्राधिकरणांची जबाबदारी आहे.जीवन प्राधिकरणांने आपली फसवणूक केलेली आहे. व ब-याच अटींची पुर्तता केलेली नाही.

मा.आयुक्त - १९९९ पुर्वीची थकबाकी जीवन प्राधिकरणांने भरावयाची आहे. व त्यानंतरच्या थकबाकी बाबत मनपाची जबाबदारी आहे.

मा.श्री.दिप चव्हाण - शासनाचे डायरेक्शन काय आहे.कर्ज घेवून पैसे भरावे असे आहे काय ? अंतिम महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मंजुर नाही.कार्यवृत्त कायम करण्यांसाठी घेतलेले नाही. ५ लाख टोकन तरतुदीला मंजुरी नाही.बजेट मंजुर नसतांना अंतिम मंजुरी कशी घेणांर कर्ज घेणे

योग्य आहे काय ? हा विषय बजेट मिटींग मध्ये का आणलेला नाही.ब-याच नगरपालिकांकडे वीज मंडळाची थकबाकी आहे.याबाबत एमएसईबीने कोणत्याही कोर्टामध्ये दाखल केलेले नाही.रिट पिटीशन फक्त अहमदनगर महानगरपालिकेकडे दाखल झालेला नाही.

कर्ज घेण्यांसाठी तरतुद केलेली नाही.बजेट मंजुर करुन अगोदर घ्यावे.व नंतरच विषय मंजुर करावा.कारण हा विषय बजेटशी निगडीत आहे.दि.१८-२-०५ च्या बजेट मिटींगचे प्रोसिडींग वाचुन दाखववे. परस्पर मंजुर झाले आहे काय त्याचा खुलासा करावा.

हा विषय तहकुब ठेवुन बजेट मंजुर झाल्या नंतरच घ्यावा.

थकबाकी बाबत शासनाने परिपत्रक काढलेले आहे.हायकोर्टाचा निर्णय नाही माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथजी मुंडे यांचा निर्णय डावलला गेला आहे.त्यावेळस ठरलेल्या प्रमाणे दरमहा २० लाख रुपये भरत असतांना त्याचे आपण दरमहा ३० लाख रुपये केलेले आहे.व आता ७० लाख भरीत आहोत म्हणजे एक्स्ट्रॉ ४० लाख रुपये बील भरीत आहोत.

तरी बजेट मंजुर झाल्यानंतर विषय घेण्यांत यावा.

मा.श्री.कृ.द.जाधव - विषय मांडण्याअगोदर खुलासा होणें आवश्यक आहे.की कोणते विषय घ्यावयाचे किंवा कोणते विषय घ्यावयाचे नाहीत याबाबत पार्टीमिटींग मध्ये अगोदरच चर्चा झालेली असते. नंतरच जनरल सभेपुढे सदर विषय येतात.

महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजना ही वेगळी आहे.३२ कि.मि.वरुन पाणी आणावे लागते.२ ते ३ ठिकाणी पाणी लिफ्ट करावे लागते. नैसर्गिक पाणी येत नाही.म्हणुन महानगरपालिकेची स्पेशल केस म्हणुन शासन दरबारी प्रयत्न करावे.व विषय तहकुब न ठेवता शासनांकडे स्पेशल केस पाठवावी.शिष्टमंडळ शासनांकडे पाठवावे व सविस्तर शासन दरबारी प्रस्ताव मांडुन प्रयत्न करावा.व शासनांस आपली बाजु पटवून द्यावी.

मा.आयुक्त - याबाबत मा.प्रधान सचिव यांना माहिती दिलेली आहे. वीज बील भरणे आवश्यक असल्याचे शासनाने सांगितले आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव - यांनी पुढे सांगितले की,श्री.नामदेव पवार व श्री.कोतकर यांना शासन दरबारी शिष्ट मंडळात घेवुन जावे.

मा.श्री.दिप चव्हाण - पार्टी मिटींग मध्ये विषय ठरले जातात हे म्हणणे बरोबर आहे.तथापि पाटीमिटींग मध्ये एकमेकांची अंडरस्टॅंडिंग असते.मालेगांव ,नागपुर या ठिकाणी चुकीचे ठराव झाल्यामुळे नगरसेवकांवर कायदेशिर कारवाई झालेली होती.याची माहिती दिलेली आहे.कायद्याचा मुद्या महत्वाचा आहे.

मा.श्री.कैलास गिरवले - याबाबत सर्वपक्षिय झालेलया सभेमध्ये याबाबत जबाबदारी स्वीकारलेली आहे.तरी शासनांकडे प्रस्ताव मांडावा व प्रयत्न करावे.याबाबत शिष्ट मंडळामध्ये श्री.कोतकर श्री.भाऊ जाधव यांची समिती नेमावी.

मा.महापौर - थकबाकी बाबत समिती नेमुन शासनांकडे पाठपुरावा करुन बजेट मंजुर झाल्यानंतर चर्चा करु असे सांगितले.

मा.आयुक्त - विद्युत संजिवनी योजना ३१ मार्च २००५ पर्यंत असल्यामुळे तातडीने हा विषय चर्चेसाठी आणण्यांचे कारण आहे. त्यापुर्वी निर्णय झाला पाहिजे. याबाबतची जबाबदारी यानंतर मनपावर येणांर आहे. व नागरिकांनाही अडचण सोसावी लागणांर आहे.

मा.श्री.दिप चव्हाण -- मनपाने बील थकविलेले नाही.करंट बील भरत आहोत.थकबाकी बाबत वाद आहे.

मा.महापौर - मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सर्व पक्षिय समिती नेमुन याबाबत शासनांकडे पाठपुरावा करण्यांत यावा व तोपर्यंत विषय तहकुब ठेवावा असे सुचविले व बजेट मंजुर झाल्यानंतर विचार करु.

मा.श्री.अशोक कानडे - सदर विषयाबाबत विरोध नोंदवावा.याबाबतचे रुलिंग अध्यक्षांनी विचार करुन द्यावे.कर्ज घेण्यांबाबतचा विषय तहकुब ठेवावा.

मा.श्री.अभय आगरकर - या विषयाबाबतचे रुलिंग बाबत विचार करुन निर्णय द्यावा.एकदा तहकुब केलेला विषय तीन महिने घेता येणांर नाही.

मा.श्री.नामदेव पवार - वीज पुरवठा केंव्हाही खंडित होऊ शकतो तेंव्हा याबाबत काय निर्णय झाला.व्यवस्थित निर्णय घ्यावा.

मा.श्री.आसाराम कावरे - शासनांने कर्ज माफ करावे.पुणे महापालिकेकडुन कर्ज घ्यावे.

मा.आयुक्त - यांनी खुलासा केला सार्वजनिक पाणीपुरवठा जलसंजिवनी योजना ही नगरपालिका करीता मर्यादीत आहे. व ही थकबाकी जी आहे ती नगरपालिकेच्या वेळेची आहे.मा.प्रधान सचिव यांचेकडील मिटींगचे वेळी या योजनेचा फायदा महानगरपालिकेला घेता येईल किंवा कसे याबाबत सांगितले वरुन प्रस्ताव ठेवलेला आहे.व योजनेचा लाभ घेण्यांबाबतचा प्रस्ताव मांडलेला आहे.तेंव्हा या योजनेचा मनपाला लाभ घेता येईल.

मा.श्री.कानडे - यांनी विचारले की याबाबत मनपाकडे लेखी काही माहिती नाही काय ?

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की,

मा.आयुक्त - विद्युत मंडळाची ही योजना आहे.सक्षम अधिकारी यांनी खुलासा याबाबत केलेला आहे.

मा.श्री.कानडे - मनपाची आर्थिक कोंडी करण्यांचा हा प्रयत्न आहे.जकात अनुदान बंद जिल्हाधिकारी यांनी शिक्षण व रोजगार हमी परस्पर कापुन घेतलेले अनुदान व बजेट मंजुरी नसतांना तेरा कोटी कर्ज घेण्यांचा सल्ला दिला जातो हे आर्थिक दृष्टया योग्य नाही.तरी मी विरोध करतो.प्रस्ताव रद्य करावा.

मा.श्री.सतिष मैड - यांनी जड वाहतुकी बाबतचा प्रश्न मध्ये उपस्थित केला.

मा.श्री.सुरेश शेळके - याबाबत श्री.अशोक बसाक यांचेकडे निर्णय झालेला होता.तरी याबाबत समिती नेमावी अशी विनंती केली.

मा.महापौर - विद्युत पुरवठा खंडित बाबतच्या आलेल्या नोटीसी वरचा प्रस्ताव तहकुब करुन सर्वपक्षिय समितीचे शासनांकडे शिष्ट मंडळ घेवुन जावे असे सुचविले.

--*--

ठराव : अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठयासाठी केला जाणांरा विद्युत पुरवठा खंडित करणें बाबतच्या महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या आलेल्या नोटीसवरचा प्रस्ताव तहकुब करुन सर्व पक्षिय समितीचे शिष्टमंडळ मा.शासनांकडे घेऊन जावे. तदनुषंगिक येणां-या खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे.ठराव सर्वानुमते मंजुर.
सुचक : मा.श्री.कैलास गिरवले
अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय : महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि., अहमदनगर या खाजगी एजन्सीस मौजे बुरुडगांव सर्व्हे नं.३४ (पैकी) या अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेवर ओल्या कच-या पासुन सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्प उभारणे व चालविणेस देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : अहमदनगर महानगरपालिका हद्दीत निर्माण होणांरा घनकचरा गोळा करुन या घनकच-याची विल्हेवाट लावण्यांसाठी मा.केंद्र शासनांने सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार घनकचरा ( व्यवस्थापन व हाताळणी ) नियम २००० प्रसिध्द केलेले असुन अंमलबजावणी विहीत कालावधीत होण्यांच्या दृष्टीने कालमर्यादा निश्चीत केलेली आहे.

त्यानुसार तत्कालीन अहमदनगर नगरपरिषदेने कच-यापासुन खतनिर्मिती प्रकल्प करण्यांसाठी " बांधा वापरा व हस्तांतर करा " ( बी.ओ.टी ) या खाजगी तत्वावर वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन टेंडर काढले होते. या बीओटी तत्वावरील टेंडरला अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला व त्यानुसार तुलनात्मक दृष्टया योग्य असलेली तेजश्री टेक्नॉलॉजी सर्व्हीसेस इनकार्पोरेटेड,पुणे,या खाजगी एजन्सीचा प्रस्ताव मा.नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि.२५-४-२००३ अन्वये मंजुर करण्यांत आला.सदर खाजगी एजन्सीस वेळोवेळी करारनामा करुन घेणें बाबत कळविले असता त्यांचेकडुन कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.सदर एजन्सीने करारनामा करुन घेणे ऐवजी दि.२९ जुलै २००३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की,बुरुडगांव स.नं.३४ ( पैकी ) ही जागा कर्ज मिळणे कामी तारण ठेवणे,कर्ज मिळणेंसाठी महानगरपालिकेने जामिनदार राहणें व कर्ज प्राप्त करणेंसाठी महानगरपालिकेने एजन्सी बरोबर भागीदारी करणे,अशा प्रकारच्या अटी नमुद केल्या मात्र मा.नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १३ दि.२५-४-२००३ अन्वये ठराव करण्यांत आला की,सदर प्रकल्पासाठी लागणांरा निधी हा कंपनीस / एजन्सीस स्वबळावर उभारावा लागेल. व त्यासाठी नगरपरिषद कुठल्याही प्रकारे साहय करणांर नाही.दरम्यानच्या काळात नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये व तत्कालीन ऑफिसर इन्चार्ज तथा जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे खतनिर्मिती प्रकल्प करणेंसाठी विलंब होत असल्यांने व तेजश्री टेक्नॉलॉजी सर्व्हीसेस इनकार्पोरेटेड,कोथरुड,पुणे या खाजगी एजन्सीने कुठल्याही प्रकरची कार्यवाही न केल्यामुळे तसेच कुठलाही प्रतिसाद न दिल्याने सदर खाजगी एजन्सीचा मंजुर केलेला प्रस्ताव रद्य करण्यांत आला.व " बांधा वापरा व हस्तांतर करा " ( बी.ओ.टी ) या खाजगी तत्वावर बुरुडगांव स.नं.३४ ( पैकी ) या जागेवर कच-यापासुन खतनिर्मिती करणेंसाठी फेरनिविदा काढणेंत आल्या.

सदर कामांसाठी खालीलप्रमाणे दोन खाजगी संस्था / ठेकेदार यांचे प्रस्ताव प्राप्त झाले.

१.महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडीया प्रा.लि. ,अहमदनगर.

२.ग्रीनगोल्ड एनर्जी प्रा.लि.चिंचवड,पुणे.

त्यानुसार त्यांचा तुलनात्मक तक्ता पाहता वरीलपैकी ग्रीनगोल्ड एनर्जी प्रा.लि.चिंचवड,पुणे या खाजगी कंपनीने सादर केलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेने टेंडर मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तींना अनुसरुन नव्हता व बीओटी या तत्वावर आधारित नव्हता. महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडीया प्रा.लि. ,अहमदनगर या खाजगी एजन्सीने सादर केलेला प्रस्ताव अहमदनगर महानगरपालिकेने टेंडर मध्ये नमुद केलेल्या बहुतांशी अटी व शर्तींची पुर्तता करीत असल्यामुळे मे.महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडीया प्रा.लि. ,अहमदनगर यांच्या प्रस्तावास मा.प्रशासक ठराव नं.२१३ दि.८-१२-२००३ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.नं.३४ ( पैकी ) या जागेवर ओल्याकच-

यापासुन प्रायोगिक तत्वावर सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रात्यक्षिक प्रकल्प तीन महिन्यांच्या कालावधी साठी उभारणे व चालविणेंसाठी मंजुरी देण्यांत आली त्याअनुषंगाने सदर खाजगी एजन्सी बरोबर तीन महिन्याच्या कालावधीसाठी अटी व शर्तीनुसार करारनामा करण्यांत आला व त्यानंतर दि.११-१२-२००३ पासुन ५ मे.टन ओल्या कच-यापासुन सेंद्रिय जैविक खत निर्मितीचा प्रायोगिक तत्वावर प्रात्यक्षिक प्रकल्प बुरुडगांव स.नं.३४ ( पैकी ) या महानगरपालिकेच्या जागेवर चालू करण्यांत आला.

❖ तदनंतर सदर खाजगी एजन्सीने प्रायोगिक तत्वावर उभारलेल्या प्रात्यक्षिक तत्वावर उभारलेल्या प्रकल्पाची मुदत दि.१०-३-२००४ रोजी संपत आल्यामुळे व आचारसंहितेचा काळ असल्यांने सर्वसाधारण सभा व धोरणात्मक निर्णय शक्य नसल्यांने मा.आयुक्त सो.यांनी दिलेल्या आदेशानुसार सदर खाजगी एजन्सीस पुढील तीन महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यांत आली. त्यानंतर पुन्हा सदर खाजगी एजन्सीस दिलेली तीन महिन्यांची मुदत दि.१०-६-०४ रोजी संपत आल्यामुळे मा.आयुक्त सो.यांनी मे. महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडीया प्रा.लि.,अहमदनगर या खाजगी एजन्सीस दिर्घ मुदतीसाठी बीओटी या तत्वावर खतप्रकल्प चालविण्यांस देणेबाबतचा विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांसाठी आदेश दिले. तदअनुषंगाने .महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडीया प्रा.लि.,अहमदनगर या खाजगी एजन्सीस १५ वर्ष मुदतीचे कालावधीसाठी ३० मे.टन.क्षमतेचा खतप्रकल्प उभारणेंसाठी मान्यता देणे किंवा याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा दि.२०-५-२००४ पुढे ठेवला असता मा.महानगरपालिका ठराव क्रमांक ५ दि.२०-५-२००४ अन्वये खालील प्रमाणे ठराव करण्यांत आला.

ठराव :

मे.महाराष्ट्र बायोफर्टीलायझर्स इंडीया प्रा.लि.अहमदनगर या खाजगी एजन्सीस शहरात जमा होणा-या कच-याची विल्हेवाट लावणेसाठी १५ मे टन ओल्या कच-यापासून सेद्रींय जैविक खत तयार करण्याच्या प्रात्याक्षिक प्रकल्पाकरीता १५ मे.टन ओला कचरा पुरविण्यात यावा.या प्रकल्पाकरीता आवश्यक असलेले प्लॅटफॉर्मची सुविधा महानगरपालिकेमार्फत देण्यात यावी.सदरच्या प्रकल्पास ६ महीने मुदत वाढ देण्यात यावी.दरम्यानच्या काळात मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती स्थापन करुन सदर एजन्सीस खत प्रकल्पासाठी मुदतवाढ देणे किंवा कसे याबाबत निर्णय घेवून अंतिम मंजूरीसाठी सहा महीन्यानंतर पुन्हा मा.सर्वसाधारण सभेपुढे विषय घेण्यात यावा.

त्यानुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ५ दि.२०-५-०४ अन्वये मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली दि.२३-७-२००४ रोजी इतर महानगरपालिकेस भेटी देऊन वरील विषयांचा अभ्यास करुन ( खत प्रकल्प ) त्वरीत अहवाल देण्यांसाठी ७ जणांची खालीलप्रमाणे समिती नेमण्यांत आली.

समिती खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.श्री.भगवान प्रल्हाद फुलसौंदर | अध्यक्ष |
| २ | मा.श्री.ज्ञानेश्वर सदाशिव खांडरे | सदस्य |
| ३ | मा.श्री.विनीत नाथ पाऊलबुध्दे | सदस्य |
| ४ | मा.सौ.मंगला सतिष गुंदेचा | सदस्य |
| ५ | मा.सौ.योगिता रणजित सत्रे | सदस्य |
| ६ | मा.श्री.शेख आरिफ शेख रफीउद्यीन | सदस्य |
| ७ | मा.श्री.अनिल वसंतराव बोरुडे | सदस्य |

त्याअनुषंगाने दि.२४-७-२००३ रोजी मा.महापौर सो.यांचे सुचनेप्रमाणे नेमलेले पथक यांनी प्रथम नाशिक महानगरपालिका नाशिक येथे उभारलेल्या कंपोष्ट खत प्रकल्पाची पाहणी केली. परंतु सदरचा खत प्रकल्प हा बांधा वापरा व हस्तांतरीत करा ( बीओटी ) या खाजगी तत्वावर खाजगी

संस्थेमार्फत चालविला जात नसून नाशिक महानगरपालिकेने स्वत : रुपये ७.५० कोटी ( साडेसात कोट ) ची गुंतवणुक सदरचा कंपोष्ट खत प्रकल्प उभारला आहे.सदरचा प्रकल्प चालविणे,देखभाल दुरुस्ती तसेच इंधन,कर्मचारी इत्यादीसाठी रु.२.५० कोटी ( अडीच कोट ) इतका खर्च दरवर्षी लागत आहे.नाशिक महानगरपालिका स्वत : सदरचा खत प्रकल्प चालवित आहे.या प्रकल्पापासुन नाशिक महानगरपालिकेस एकुण ७५ ते ८० लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळत आहे.हा प्रकल्प चालविणेंसाठी लागणां-या खर्चाच्या तुलनेत फक्त ३५ % महसुल नाशिक महानगरपालिकेस मिळतो.

त्यानंतर दि.७-१-२००५ रोजी मा.महापौर साो.यांचेशी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी सुचविल्याप्रमाणे दिनांक १७-१-२००५ रोजी मे.महाराष्ट्र बायोफर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि.अहमदनगर
या खाजगी एजन्सीने लातुर येथे उभारलेल्या ओल्या कच-यापासुन सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्पाची पाहणी करणेंसाठी मा.महापौर साो.यांनी नेमलेल्या समिती सदस्यांपैकी मा.महापौर श्री.भगवान प्रल्हाद फुलसौंदर,मा.नगरसेवक श्री.विनित पाऊलबुध्दे ,मा.सौ.योगिता सत्रे,नगरसेविका इ.उपस्थित होते. या व्यतिरिक्त मा.श्री.मनिष साठे,सभापती स्थायी समिती मा.श्री.बहिरनाथ वाकळे ,विरोधी पक्षनेता मा.श्री.अभय आगरकर,माजी सभापती स्थायी समिती मा.श्री.अशोक कानडे,नगरसेवक तसेच मनपाचे अधिकारी वर्ग उपस्थित होते.

त्याचप्रमाणे दि.२७-१-२००५ रोजी मा.महापौर साो.यांचेशी पुन्हा झालेल्या चर्चेनुसार व दि.२८-१-२००५ रोजी मा.आयुक्त साो.यांचेशी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी सुचविल्याप्रमाणे दिनांक ३१-१-२००५ रोजी मे.महाराष्ट्र बायोफर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि.अहमदनगर या खाजगी एजन्सीने लातुर येथे उभारलेल्या ओल्या कच-यापासुन सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्पाची भेट देऊन पाहणी करणेंसाठी मा.महापौर श्री.भगवान प्रल्हाद फुलसौंदर ,मा.आयुक्त श्री.द.प.मेतके,मा.श्री.मिलिंद गंधे,सदस्य स्थायी समिती,मा.उपायुक्त डॉ.श्री.सुनिल लहाने व श्री.आर.जी.मेहेत्रे,शाखा अभियंता,घनकचरा व्यवस्थापन व श्री.म्हस्के आर.ए.मदतनीस घनकचरा व्यवस्थापन हे उपस्थित होते.

या भेटी बाबत सदर खाजगी एजन्सीच्या पदाधिका-यांची मा.महापौर व मा.आयुक्त यांचेशी झालेल्या बैठकीमध्ये खालील महत्वाच्या मुद्यांनुसार चर्चा करण्यांत आली.

१. कंपनी कोणतीही रॉयल्टी देण्यांस असमर्थ आहे. यावर चर्चा होऊन कंपनीने १ टक्के रॉयल्टी देण्यांस तयारी दर्शविली.
२. कंपनीस दिलेल्या भुखंडाचे नाममात्र भाडे देण्यांस कंपनी तयार आहे.
३. कंपनी पाणी कर ( पटटी ) भरण्यांस तयार आहे. पाणी उपलब्ध करुन देण्यांची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.
४. कंपनी विद्युत आकार देण्यांस तयार आहे. विद्युत जोडणी महानगरपालिकेने करुन द्यावी.
५. कंपनीस प्रक्रिया प्रकल्प किमान १५ ते २० वर्ष कालावधीसाठी चालविण्यांस द्यावा लागेल.
६. प्रकल्प मंजुर झाल्यानंतर कंपनी अहमदनगर महानगरपालिकेकडे अनामत रक्कम रुपये एक लाख ( रु.१,००,००० /- ) भरण्यांस तयार आहे.

याबाबत नाशिक महानगरपालिका ,नाशिक येथील कंपोष्ट खत प्रकल्प व मे.महाराष्ट्र बायोफर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि.अहमदनगर या खाजगी कंपनीने लातुर येथे उभारलेल्या ओल्या कच-यापासुन सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्प पाहणीची तुलना करता लातुर येथे सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्प अहमदनगर महानगरपालिकेच्या दृष्टीने खालील बाबींमुळे योग्य वाटतो.
१.अहमदनगर महानगरपालिकेस सदर खत प्रकल्पासाठी कुठलीही आर्थिक गुंतवणूक करावी लागत नाही.

२.महानगरपालिकेच्या सध्या असलेल्या बुरुडगांव स.नं.३४ ( पैकी ) येथील जागेपैकी केवळ १० एकर जागा सदर खाजगी एजन्सीला खत प्रकल्पासाठी द्यावी लागेल.
३.सदरचा प्रकल्प हा पर्यावरणाशी समतोल राखणांरा असल्यांने आसपासच्या परिसरामध्ये प्रदुषण होणांर नाही.
४.सद्यस्थितीत कचरा डेपोवर दैनंदिन गोळा होणां-या ६० मे.टन कच-यापैकी ३० मे टन ओल्या कच-याची खत निर्मिती करुन विल्हेवाट लावण्यांत येईल.
५.सदर प्रकल्पापासुन होणां-या उत्पन्नावर १ % रॉयल्टी देण्यांस सदर खाजगी एजन्सी तयार आहे.

वरील बाबी पाहता खालील अटी व शर्तीस अधिन राहुन मे.महाराष्ट्र बायोफर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि.अहमदनगर या खाजगी संस्थेस १५ वर्षासाठी ओल्या कच-यापासुन सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्प उभारणे व चालविणेंस देणे अहमदनगर महानगरपालिकेच्या दृष्टीने योग्य आहे.

अटी व शर्ती :

१. अहमदनगर महानगरपालिके मार्फत दैनंदिन शहरातुन गोळा होणांरा कचरा सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्पाच्या ठिकाणी नियमितपणे स्वखर्चाने स्वप्रयत्नाने वाहतुक करुन देण्यांत येईल.मात्र महानगरपालिका कर्मचारी संप,शहरामध्ये संचारबंदी ( करफ्यू ),पाऊस ,पुर,भुकंप इ.नैसर्गिक आपत्ती ,आपतकालीन परिस्थिती किंवा इतर काही महत्वाच्या कारणांमुळे महानगरपालिका शहर हद्यीत गोळा होणां-या कच-याची वाहतुक महानगरपालिका बुरुडगांव स.नं.३४ पैकी या कचरा डेपोच्या जागेवर करु शकत नाही.

२. प्रकल्पासाठी लागणांरा आवश्यक भुखंड १० एक जागा , प्रोसेसिंग प्लॅटफॉर्म ( प्रक्रिया तळ ) व आवश्यक सुविधा पाणी विज मनपा उपलब्ध करुन देईल.

३. सदरचा प्रकल्प उभारणे व चालविण्यांची कालमर्यादा किमान १५ ( पंधरा ) वर्ष राहील.

४. अहमदनगर महानगरपालिका या प्रकल्पासाठी लागणांरी जागा प्लॅटफॉर्म,भाडेपटटीवर सदरचे संस्थेस उपलब्ध करुन देईल.त्यासाठी सदरचे खाजगी संस्थेस महानगरपालिका नियमाप्रमाणे भाडे द्यावे लागेल.

५. सदरची संस्था प्रकल्पापासुन होणां-या उत्पन्नावर १ % ( एक टक्का ) रॉयल्टी दरवर्षी अहमदनगर महानगरपालिकेस देण्यांस बांधील राहिल.सदरची रॉयल्टी दरवर्षी मागील वर्षाच्या उत्पन्नावर १ % ( एक टक्का ) प्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस १५ एप्रिलपर्यंत भरणे सदर संस्थेस बंधनकारक राहिल.

६. सदर प्रकल्पावर निर्माण झालेल्या उत्पन्नाची ( खताची ) विक्री व विल्हेवाट सदर खाजगी संस्थेने स्वत : स्वखर्चाने करावयाची आहे.

७. सदरचे खाजगी संस्थेने महानगरपालिकेकडे करारनामा सोबत बिनव्याजी अनामत रक्कम पोटी रुपये रुपये १,००,००० /- ( एक लाख फक्त ) भरणें आवश्यक आहे. सदर बिनव्याजी अनामत रक्कम महानगरपालिकेकडे प्रकल्प चालविला जाणां-या कालावधीपर्यंत राहिल.

८. सदरचे प्रकल्पासाठी दैनंदिन लागणांरा संपूर्ण भांडवली खर्च व प्रकल्प चालविण्यांसाठी दररोजचा देखभाल खर्च स्वत : सदर खाजगी संस्थेला करावा लागेल.

९. सदर प्रकल्प उभारण्यांसाठी व भविष्यकाळात प्रकल्प चालविण्यांसाठी लागणांरा निधी,आवश्यक यंत्रसामुग्री ,मनुष्यबळ,वाहन इ.सदरचे खाजगी संस्थेला स्वत : उभारावा लागेल त्यासाठी अहमदनगर महानगरपालिका कुठलेही सहाकार्य व कुठलेही प्रकारचे अर्थसहाय्य करणांर नाही.किंवा जामिनदार राहणांर नाही. अथवा महानगरपालिकेची वास्तु आरक्षित जमिन सदरचे प्रकल्पासाठी तारण ठेवणांर नाही.

१०. सदर खत प्रकल्पासाठी दररोज वापरात येणांरे वीज व पाणी कनेक्शन वापरण्यांच्या खर्चापोटी येणांरे बील सदर खाजगी संस्थेला स्वत : भरावे लागेल.

११. अहमदनगर महानगरपालिकेने दैनंदिन पुरवठा केलेल्या कच-याचे पृथःकरण ( ओला व सुका ) सदर खाजगी संस्थेने करावयाचे आहे.

१२. सदर खाजगी संस्थेने कामाबाबतची ऑर्डर मंजूर झाल्यावर योग्य त्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल व एक महिन्याच्या आत ( ३० दिवसात ) सदर प्रकल्पाची उभारणी करुन प्रकल्प चालू करावा लागेल.

१३. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे घनकचरा ( व्यवस्थापन व हाताळणी ) नियम २००० च्या अंमलबजावणी काटेकोर पालन सदरचे संस्थेस करावे लागेल.

१४. प्रकलपाची उभारणी व प्रकल्प चालविण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,यांचेकडील आवश्यक ते प्रमाणपत्र ( ऑथोरायझेशन ) ना हरकत दाखला (परवाना ) घेण्याची व तसेच मिळालेल्या प्रमाणपत्राचे ( ऑथरायझेशनचे ) नुतणीकरण दरवर्षी करून घेण्याची व आवश्यक नोंद वही ठेवून अहवाल सादर करणेची सर्व जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.त्यासाठी आवश्यक ते सहकार्य महानगरपालिका करेल.

१५. प्रकल्पाच्या ठिकाणी सेंद्रिय जैविक खत तयार करण्यांसाठी वापरात येणांरे आवश्यक घटक व मिश्रण यापासुन सदरचे परिसरातील रहिवासी ,नागरिकांना त्रास होता कामा नये.तसेच सदर परिसरातील हवा,प्रदुषण व भुगर्भातील पाणी प्रदुषण तसेच सदरच्या प्रकल्पामुळे रोगरोई न पसरण्यांची काळजी घेणे सदर खाजगी संस्थेला बंधनकारक राहील.

१६. सदर खाजगी संस्थेकडे कचरा डेपो पासुन ५०० मिटर परिघ परिसरातील जमिनीखालील विहीर,बोअर मधील पाण्याची जैविक व रासायनिक नमुना तपासणी करणेची कार्यवाही दरवर्षी तीन महिन्यातुन एकदा शासकीय अधिकृत प्रयोगशाळे कडून करुन घेण्यांची जबाबदारी राहील. तसेच जल,वायु व जमिन प्रदुषण होऊ नये याबाबत काळजी घेणे सदर संस्थेस आवश्यक आहे.

१७. पावसाळयामध्ये प्रकल्पासाठी साठवणुक केलेल्या कच-यावर पाणी पडून वाहणां-या पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट संबंधित संस्था यांना करावी लागेल. तसेच भुमिगत जलप्रदुषण होणांर नाही याची सर्व जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.

१८. सदरच्या प्रकल्पामुळे आसपासचे ,आजुबाजुचे शेतकरी,रहिवासी,व्यावसायिक व सदरचे प्रकल्पामध्ये काम करणांरे कर्मचारी यांना कुठल्याही प्रकारची जिवित हानी,इजा,भरपाई नुकसान अथवा कोर्टदावे झाल्यास अहमदनगर महानगरपालिका जबाबदार राहणांर नाही.त्याची सर्व जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.

१९. सदर प्रकल्पासाठी आवश्यक कर्मचा-यांची नेमणुक करणे,प्रचलित नियमानुसार त्यांचे सेवाशर्ती ठरविणे,सदर प्रकल्पाच्या मुदत कालावधीत किंवा नंतर सदर प्रकल्पामध्ये काम करणां-या कर्मचा-यांची सर्व जबाबदारी सदर खाजगी एजन्सीवर राहील. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पामध्ये काम करणां-या कर्मचा-यांना आवश्यक प्रोटेक्टिव्ह इक्विपमेंट उदा.मास्क,हँडग्लोज,गमबुट,गॉगल इत्यादी सदर खाजगी एजन्सीने पुरवावे लागेल. कर्मचा-यांची नियमित वैद्यकिय तपासणी करणे देखभाल करणे,आवश्यक सुविधा देणे व इतर सर्व जबाबदारी सदर खाजगी एजन्सीवर राहील.

२०. नैसर्गिक आपत्ती,उदा.आग,पाणी,पाऊस,पुर,भुकंप इ.व इलेक्ट्रिक शॉर्ट सर्किट या कारणांमुळे सदर प्रकल्पाची काही नुकसान झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणांर नाही,यासाठी आवश्यक वाटल्यास सदर खाजगी एजन्सीने स्वत : विमा करुन घ्यावा लागेल.

२१. सदर प्रकल्पाच्या कालावधी दरम्यान प्रकल्पाची पाहणी निरिक्षण,निर्मिती अहवाल सदर खाजगी संस्थेकडुन अहमदनगर महानगरपालिकेस द्यावा लागेल व मनपाचे अधिकारी कधीही पाहणीसाठी येतील.

२२. सदर खाजगी संस्थेला कामाबाबतची ऑर्डर मंजुर झाल्यावर योग्य त्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. व एक महिन्यांच्या आत ( ३० दिवसात ) सदर प्रकल्पाची उभारणी करुन प्रकल्प चालू करावा लागेल.

२३. सदर खाजगी संस्थेला भाडेपटटीवर उपलब्ध करुन दिलेल्या जागेत मनपा अहमदनगर यांच्या लेखी परवानगी शिवाय कुठलयाही प्रकारचे बांधकाम,दुरुस्ती अथवा फेरबदल करता येणांर नाही,किंवा सदर जागेचा पोट हिस्सा करुन भाडयाने देता येणांर नाही.

२४. सदर खाजगी एजन्सीचे काम असमाधानकारक वाटल्यास किंवा अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सदर खाजगी एजन्सीबरोबर महानगरपालिकेने केलेला प्रकल्प करारनामा कुठल्याही क्षणी रद्य करण्यांचे अधिकार एक महिन्याची आगाऊ नोटीस देवुन मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका राखुन ठेवित आहे.तसेच प्रकल्प बंद पडल्यास सदरच्या खाजगी संस्थेस महानगरपालिकेमार्फत कुठल्याही प्रकारची भरपाई दिली जाणांर नाही.

२५. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी व परिसराची साफसफाई,देखभाल दुरुस्ती करण्यांची जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी व परिसरामध्ये वृक्षलागवड ग्रीन बेल्ट करण्यांची जबाबदारी सदर खाजगी संस्थेची राहील.

२६. सदर प्रकल्पाच्या अटी व शर्तीनुसार मुदत कालावधी संपल्यानंतर सदर खाजगी एजन्सीकडे खत प्रकल्प चालविण्यांकरीता इच्छुक असल्यास अहमदनगर महानगरपालिका त्यावर विचार विनिमय करुन निर्णय घेईल.

तरी ऑफिस रिपोर्ट योग्य त्या पुढील कार्यवाहीस व आदेशार्थ सविनय सदर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की,उपरोक्त अटी व शर्तीसह बुरुडगाव कचरा डेपो येथे महानगरपालिकेच्या जागेवर ओल्या कच-यापासुन सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्प महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स,प्रा.लि.अहमदनगर यांना उभारणे व चालविणेंस देणेंबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

अशाबाबत ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( कर ) यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--- *---

मा.खास सभेतील चर्चा :-

मा.श्री.उडाणशिवे : कच-या मध्ये ओला आणि सुका कचरा फार असतो.ओल्याबरोबर सुका कचरा जास्त येत असतो.१ वर्षापासुन दारिद्रय रेषेखालील लोकांनी ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यांसाठी जागा मागणी केलेली आहे.त्याबाबत २०० स्क्वे.फुट जागा कष्टकरी पंचायत समितीला देण्यांबाबतचा ठरावही झालेला आहे.परंतु अद्याप जागाही दिलेली नाही.याबाबत मनपावर खर्चाचा कोणताही बोजा नाही.उलट मनपाचा फायदाच आहे.तरी त्याबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती केली.

मा.सौ.मंगला गुंदेचा - खत प्रकल्पा बाबत अभ्यास होई पर्यंत विषय तहकुब करावा.

मा.श्री.अनंत जोशी - कमिटीचा अहवाल सभेपुढे ठेवावा.अहवाल आला नसतांना हा विषय अजेंडयावर का घेण्यांत आला.याबाबतचा आलेला अहवाल वाचावा. अहवाल अद्याप आलेला नाही असा महापौर यांनी खुलासा केला.

मा.श्री.आगरकर - समिती गठीत करतांना ती या सभेमध्येच करावयास पाहिजे तसे न करता आपल्या ऑफिस मध्ये समिती गठीत करता अशाप्रकारची कृती अपेक्षित नाही हे चुकीचे आहे.याबाबतचे उत्तर गांभिर्य पुर्वक मिळाले पाहिजे.समितीकडुन अहवाल आलेला नाही.अहवालावर निर्णय घेतलेला नाही.स्थायी समिती आयुक्त व सदस्य यांनी प्रोजेक्ट पहावा व कमिटीचा अहवाल घ्यावा.

मा.महापौर - पुन्हा एकदा जाऊन आल्यावर अहवाल द्यावा.

मा.श्री.कृ.द.जाधव - या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे.विषय पुढे घ्यावयाचा असे ठरलेले आहे.याबाबत समितीने जे पत्र दिलेले आहे ते वाचुन दाखवावे.सदरचे पत्र वाचुन दाखविण्यांत आले.

मा.श्री.दिप चव्हाण - सर्वोच्च न्यायालयाने सदर विषयाबाबत कालमर्यादा निश्चीत करुन दिलेली आहे. हा प्रोजेक्ट मनपा स्वत : का चालवित नाही.याबाबत कमिटीने सुध्दा अभ्यास केलेला आहे.आपण स्वत : प्रकल्प करावा.मनपात क्षमता नाही काय ?

मा.श्री.दिपक सुळ - सविस्तर माहिती श्री.मेहेत्रे यांनी द्यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव - श्री.दिप चव्हाणी यांनी जी सुचना मांडली ती बरोबर आहे.

मा.आयुक्त - याबाबतची खत निर्मिती विक्री मनपाला जमणांर नाही.मार्केटींगचा विचार करु नका कच-याची विल्हेवाट लावण्यांची जबाबदारी मनपाची आहे.कंपनी मनपाकडे ट्रायलसाठी होती.मनपाकडुन गुणवत्ता व सेग्रीगेशन होत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - प्रयत्न करण्यांस काय हरकत आहे.मार्केटचा विचार करु नये .शेतकरी यांना खत फुकट द्यावे.स्वत : प्रोजेक्ट चालविण्यांचा विचार करावा.

मा.उपायुक्त श्री.लहाने - यांनी याबाबत खुलासा केला नुसत्या कच-यापासुन खत निर्मिती होत नाही.त्याला इतरही रॉ मटेरियल वापरावे लागते.मनपाला इतर रॉ मटेरियल सहजासहजी उपलब्ध होणांर नाही.

मा.श्री.आगरकर - माझे म्हणणे याबाबत वेगळे आहे.चर्चा करुन ठरविले असतांनाही त्याचा विचार केला नाही.याबाबत कंपनीने तीन प्रॉडक्ट केलेले आहे.मुलभूत कचरा मनपाचा आहे.

मा.श्री.कानडे - याबाबत निर्णय घाईने घेण्यांपेक्षा कमिटीने अभ्यास करुन निर्णय घ्यावा.

मा.महापौर - पुन्हा एकदा सर्व पक्षीय समिती पाठवुन अहवाल घेऊन निर्णय घ्यावा.

समिती

१.मा.श्री.कैलास गिरवले २.मा.श्री.उडाणशिवे ३.मा.श्री.कृ.द.जाधव ४.मा.श्री.आगरकर इ.सदस्य घेण्यांत यावे.व श्री.लहाने उपायुक्त हे समितीचे सदस्य राहतील.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.सदरच्या प्रकरणांतील मा.सर्वोच्च न्यायालय यांचे आदेशाचा विचार करता सदरचे प्रकरणांबाबत पुढील उचित कार्यवाही करणे गरजेचे असुन यास्तव मा.सदस्य यांची '' अभ्यास अहवाल समिती '' गठीत करणेंत यावी. १.मा.श्री.कृष्णा द.जाधव २.मा.श्री.कैलास गिरवले ३.मा.श्री.अनंत जोशी ४.मा.श्री.भाऊसाहेब उडाणशिवे,ठराव सर्वानुमते मंजुर.सुचक : मा.श्री.अभय आगरकर.अनुमोदक : मा.श्री.कैलास गिरवले.

सही /-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.१८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर शहर मंजूर विकास योजनेनुसार म.गांधी रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर शहराची विकास योजना शासनाने निर्णय क्र.टीपीएस्/१६७६/८५४ युडी-५ दि.१८-२-१९७८ अन्वये मंजूर केली असून दि.१-४-७८ पासून अंमलात आली आहे. सदर मंजूर विकास योजनेनुसार म.गांधी रस्ता हा ५० फूट दर्शविण्यात आला असून तत्कालीन नगरपरिषदेने विकास योजनेच्या प्रस्तावानुसार सदर रस्ता ५० फूट रुंद करण्याचे योजले आहे. त्यासाठी प्रस्तुत रस्तारुंदीकरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने सोयीस्कर असे १) भिंगारवाला चौक ते घासगल्ली कोपरा २) घासगल्ली कोपरा ते तेलीखुंट ३) तेलीखुंट ते सर्जेपुरा रंगभवन असे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्याचे सन १९८८ मध्ये रुंदीकरण करण्यात आले असून २रा व ३रा टप्पा रस्ता रुंदीकरणाने बाधित होणा-या जमिनीच्या संपादनास नगरपरिषद ठराव क्र.१४४ दि.१९-१०-१९८८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. व प्रस्ताव जा.क्र.टी.पी./भूसंपादन/एम.जी.रोड १२०२ दि.४-७-१९८९ अन्वये मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे सादर करण्यात आलेला असून त्यांनी सदर भूसंपादनकामी त्यांच्याकरीता मा.सहाय्यक संचालक,नगररचना,अहमदनगर यांची नेमणूक केलेली आहे. दरम्यान अहमदनगर शहराच्या १ली सुधारित मंजूर विकास योजनेची मुदत सन १९८८ मध्ये संपल्यानंतर नियमानुसार सर्व कार्यवाही पार पाडून सन १९९९ मध्ये शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या २री सुधारीत विकास योजनेमध्ये विषयांकित म.गांधी रस्ता ५० फूट दर्शविण्यात आलेला असून सदर योजनेस अद्याप शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही.

सदर रस्ता रुंदीकरण प्रकरणी मा.भूसंपादन अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी प्राथमिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचेकडील पत्र क्र.भु.सं./अ.नगर/म.गांधी रस्ता रुंदीकरण/२रा व ३रा टप्पा/ससंअ/१८५ दि.२२-१-०३ अन्वये घासगल्ली ते रंगभवन (२रा व ३रा टप्पा) ५० फूट रुंदीकरणाबाबतचा निवाडा दि.१५-१-२००३ रोजी प्रसिध्द करुन निवाडयाप्रमाणे रक्कम रु.२,४५,३०,०६०/- व आस्थापनेवरील खर्च ३% असे रुपये ७,३५,९०२/- अशी एकूण रक्कम रुपये २,५२,६५,९६२/- भरणेबाबत इकडे कळविले आहे.

त्यावर विषयांकित रिट पिटीशन नं.३१९०/२००२ मध्ये नगरपरिषदेच्या वतीने काम पहाणारे ॲड.श्री.गुगळे यांनी - " सदर प्रकरणाचे गांभिर्य व या प्रकरणी यापूर्वी मे.कोर्टाने दिलेला निर्णय पाहता नगरपरिषदेने न्यायालयाच्या आदेशाची पूर्णत्वाने अंमलबजावणी व्हावी व सदर आदेशाबाबत नगरपरिषदेकडून दिरंगाई अगर टाळाटाळ होत नाही हे दर्शविण्यासाठी सदर प्रकरणातील निवाडयाची रक्कम मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे त्वरीत जमा करणे आवश्यक आहे व त्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक बाबी पूर्ण करणेसाठी ताबडतोब कार्यवाही करणे आवश्यक असलेबाबत " -- दि.१५-१-२००३ च्या पत्राद्वारे मत व्यक्त केले आहे.

ॲड.गुगळे यांचा उपरोक्त अभिप्राय उचित कार्यवाहीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवला असता सर्वसाधारण सभा ठराव क्र.१ दि.५-२-२००३ अन्वये -- " अहमदनगर नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती नव्याने समाविष्ट झालेली १२ अविकसित गावे, उपनगरातील गतीने विकसीत झालेल्या बाजारपेठेमुळे मुळ शहरातील बाजारपेठेचे झालेले विकेंद्रीकरण, विकास कामात आणि अत्यावश्यक मुलभूत नागरी सुविधा देणेकरीता नगरपरिषदेवर पडणारा आर्थिक ताण, मा.सर्वोच्च न्यायालयाचे तज्ञ वकिलांकडून मागविण्यात आलेले मत व अभिप्राय वगैरे बाबीबाबत सर्वसाधारण सभेत व्यक्त

करण्यात आलेल्या भावना विचारात घेता २ व ३ टप्प्यातील म.गांधी रस्ता रुंदी सद्यस्थितीस ४० फूट ठेवण्यात येवून ५० फूट रस्ता रुंदीकरणाबाबतच्या अडचणी उच्च न्यायालयात जेष्ठ वकिल नेमून विनंती अर्ज मा.मुख्याधिकारी यांनी करावा. जेष्ठ वकिल नेमण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व मुख्याधिकारी यांना देण्यात येत आहे. त्याकामी येणा-या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. शासनाकडे प्रलंबित असलेल्या विकास आराखडयामध्ये दुरुस्तीबाबत विनंती करण्यात यावी. '' -- अशाबाबत ठराव पारित करण्यात आला आहे.

अहमदनगर शहराची २री सुधारीत विकास योजना मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेली आहे. त्यामध्ये या रस्त्याची रुंदी ५० फूटी दर्शविण्यात आलेली आहे. विकास योजना शासनाकडे सादर करताना तत्कालीन नगरपरिषदेने या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे हे रस्ता रुंदीकरण होणे उचित वाटते.

रिट पिटीशन ३१९०/२००२ या याचिकेमध्ये उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिलेला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.५ अहमदनगर महानगरपालिकेला असे डायरेक्टीव्ह दिले आहेत की - ''या याचिकेची अंतिम सुनावणी निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र.५ महानगरपालिकेने ४० फूटच रस्तारुंदी करावी. तत्कालीन नगरपरिषद बरखास्त होऊन आता नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिका झालेली आहे. तेव्हा या महानगरपालिकेने एकतर जुना ठराव क्र.१ दि.५-२-२००३ कायम करावा अथवा नवीन ठराव करुन शासनाकडे पाठवावा व शासनाने त्यावर कार्यवाही करावी. तोपर्यंत ४० फूट रस्त्याचेच काम करावे. तरी या संदर्भात म.गांधी रस्त्याचे रुंदीकरण जून्या ठरावाप्रमाणे ४० फूट ठेवावे किंवा किंवा ५० फूट ठेवावे. अथवा उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य नसून त्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात अपिल करावे याबाबत निर्णयास्तव सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

मा.खास सभेतील चर्चा :-

मा.श्री.अनंत जोशी : विषय न्याय प्रविष्ट असतांना ठराव ४० फुटी रस्ता करणेंबाबत करावा काय ? मागील ठराव कायम करण्यांत यावा.

मा.श्री.सतीष मैड : सर्व रस्ता ४० फुट करावा.मागील ठराव कायम ठेवावा.शासनांकडे पाठवावा.

मा.श्री.सुरेश शेळके : ४० फुट रस्ता करण्यांस विरोधी नाही.४० फुट रस्ता करण्यांबाबत यापुर्वी मंजुर झालेला आहे.टी.पी.स्कीम नं.४ मध्ये रस्ता १९७८ ला ५० फुटी करणें बाबत मंजुर झालेला आहे. त्यास आता २५ वर्षे झालेली आहे.हा रस्ता ४० फुटी करावयाचा झाल्यास इतर रस्त्यांना हा फायदा देणांर काय ?

मा.श्री.नामदेव पवार : बाकी रस्त्याबाबत काही अडचण निर्माण होणांर आहे काय ?

मा.आयुक्त : शासन यावर अंतिम निर्णय घेणांर आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव : १९७६ पासुनचा हा विषय आहे.५० फुट रस्ता केल्यास नुकसान भरपाई द्यावी लागेल.४० फुट रस्ता केल्यास मनपाला खर्च येणांर नाही.४० फुट रस्ता करणें गरजेचे आहे.व्यापारी स्वत:च्या खर्चाने मागे घेण्यांस तयार आहे.

मा.श्री.संदिप कोतकर : ५० फुट रस्ता करण्यांमध्ये व्यापा-याचे नुकसान होणांर आहे.४० फुट रस्ता ठेवावा अशी मागणी केली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण : सन १९७८ पासुनचा हा रस्त्याचा प्रश्न आहे.नुकसान भरपाई बाजारभावाने द्यावी लागणांर आहे. व त्यासाठी रु.३ कोटीची प्रोव्हीजन करावी लागेल.मनपाला सध्या आर्थिक ताण आलेला आहे.तो विचारात घेऊन सदरचा रस्त्याबाबतचा दुसरा व तिसरा टप्पा ४० फुट करणें तसे उच्च न्यायालयात कळविणे अशा बाबतचा ठराव यापुर्वी झालेला आहे.

न्यायालयातील अपीलाची मर्यादा संपलेली आहे.आलेली परिपत्रके व केलेले ठराव पाहिले असता व असे ठराव वारंवार येणांर नाहीत.जुना ठराव केला असतांना तो पाठविला जात नाही.४० फुट केल्यावर मनपाचा फायदा होईल. तरी ४० फुट रस्ता करण्यांबाबतचा प्रस्ताव मा.शासनांकडे पाठविण्यांत यावा.ठरावाच्या आधारे उर्वरित भाग व्यापारी काढुन घेतील.हायकोर्टातील अंतिम निकाल लागावयाचा आहे. नगरपालिका असतांना अशाबाबतचा ठराव पाठविला होता.तरी शासनाला ४० फुट रस्ता करण्यांबाबतचा ठराव पाठवावा.

मा.श्री.कैलास गिरवले : योग्य निर्णय घ्यावा असे सांगितले.हायकोर्टाने आदेश द्यावा.पैशाचा प्रश्न दरवेळी निर्माण होत आहे.त्यामुळे पुढील पिढी आपल्याला दोष देणांर आहे.

मा.महापौर - आर्थिक परिस्थिती पाहता ४० फुट रस्त्याबाबतचा ठराव पाठविण्यांत यावे असे सांगितले.

ठराव : ऑफिस रिपार्टनुसार ठरविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती व नव्याने समाविष्ट झालेले १२ अविकसीत गावे, उपनगरातील गतीने विकसीत झालेल्या बाजारपेठेमुळे मूळ शहरातील बाजारपेठेचे झालेले विकेंद्रीकरण विकासकामात आणि अत्यावश्यक मुलभूत नागरी सुविधा देण्याकरीता महानगरपालिकेवर पडणारा आर्थिक ताण तसेच माननीय नामदार उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्या रिट पिटीशन नं.३१९०/२००२ दि.१५-१२-२००३ च्या अंतरीम आदेशाच्या आधिन राहून तसेच पूर्वीच्या अहमदनगर नगरपरिषदेने केलेला ठराव नं.१ दि. ५-२-२००३ ला केलेला असून त्या ठरावास अधिन राहून व सर्वसाधारण सभेत व्यक्त करण्यात आलेल्या भावना विचारात घेता महात्मा गांधी रस्त्याचे रुंदीकरण ४० फुट ठेवण्यात येवून महाराष्ट्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या विकास आराखडयामध्ये एम.आर.टी.पी. ॲक्ट सेक्शन ३८ प्रमाणे दुरुस्तीबाबत विनंती करण्यात यावी व त्यानुसार उचित कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.संजय चोपडा.अनुमोदक : मा.श्री.सतिष मैड.ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल,

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ४ दि.१८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय - मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-२००४ - अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम पाणीपुरवठा व नगररचना विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याची मंजूर पदसंख्या अपुरी असल्याने म.न.पा.चे कामात गतीमानता कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाच्या दृष्टीने आस्थापनेवर जादा (१२) पदे निर्माण करुन त्या जागी प्रति नियुक्तीवर अभियंत्याची पदे भरणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर होवून १ वर्षाचा कालावधी होवून गेला असून तत्कालीन नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचारीच आज रोजी महानगरपालिकेचे काम पाहत आहेत. सध्याच्या आस्थापनेनुसार खालील प्रमाणे अभियंते कार्यरत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| केडर नं.१ | १. | श्री.एन.जी.मगर | सिव्हील इंजिनिअर |
| | २. | श्री.बी.एम.बडवे | -- " -- |
| | ३. | श्री.पी.जे.निकम | मेकॅनिकल इंजिनिअर |
| | | | |
| केडर नं.२ | १ | श्री.आर.जी.सातपुते | कनिष्ठ अभियंता |
| | २ | श्री.एम.डी.काकडे | -- " -- |
| | ३ | श्री.व्ही.जी.सोनटक्के | -- " -- |
| | ४ | श्री.आर.जी.मेहेत्रे | -- " -- |
| | ५ | श्री.के.वाय.बल्लाळ | -- " -- |

याशिवाय प्रतिनियुक्तीवर नगर रचनाकार श्री.दहे तर शहर अभियंता श्री.आहिरे रुजू झालेले आहेत.

अहमदनगर शहराचा ८८ चौ.कि.मी. इतका विस्तार तसेच एकूण २१ प्रभाग आणि कामांचा ताण विचारात घेता हा तांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे. त्यामुळे खालील प्रमाणे कनिष्ठ अभियंत्यांचा आकृतीबंध प्रस्तावित करत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता ( बांधकाम विभाग ) | ९ पदे | २१ प्रभागांसाठी प्रत्येक ३ प्रभागांना १ = एकूण ७<br>उप शहर अभियंता यांना सहाय्यक = एकुण १<br>शहर अभियंता यांना सहाय्यक = एकुण १ |
| २ | कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा विभाग | ३ पदे | १ पद मुख्य लाईनसाठी<br>२ पदे वितरण व्यवस्थेसाठी |
| ३ | कनिष्ठ अभियंता / कृषी अधिकारी आरोग्य विभाग | २ पदे | घनकचरा व्यवस्थापनासाठी |
| ४ | सहायक नगर रचनाकार ( नगर रचना विभाग ) | ३ पदे | २१ प्रभागांचे ३ विभाग ( प्रत्येकी ७ प्रभाग विभागणी करुन. |

महापालिकेत केवळ ५ कनिष्ठ अभियंते कार्यरत आहेत.

वरील प्रमाणे १७ कनिष्ठ अभियंता व कृषी अधिकारी दर्जाचे अधिकारी आवश्यक वाटतात. यासाठी खालील पर्याय सुचविण्यांत येत आहे.

१.एकुण आणखी १२ पदे निर्माण करुन सक्षम मंजूरीने तात्काळ भरतीची कार्यवाही करणें.

२.एकुण जादाची १२ पदे सक्षम मंजूरीने निर्माण करुन घेवून अनुक्रमांक १ साठी ४ सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंते , अनुक्रमांक २ साठी ३ शासनांच्या पाटबंधारे किंवा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभियंते, अनुक्रमांक ३ साठी शासनांच्या आरोग्य विभागाचे कनिष्ठ अभियंते, किंवा बी टेक ( कृषि ) ही शैक्षणिक पात्रता धारण करणांरे अभियंते किंवा शासनांच्या कृषिसेवा वर्ग २ चे अधिकारी अनुक्रमांक ४ साठी ३ सहाय्यक नगर रचनाकार दर्जाचे नगर रचनाकार व मुल्यनिर्धारण विभागाचे अधिकारी, तात्पुरते प्रतिनियुक्तीवर घेणें त्यानंतर टप्प्याटप्प्याने भरतीची प्रक्रिया पार पाडणें.

वरील सर्व पदांच्या निर्मितीमुळे आस्थापना खर्चात भर पडणांर असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ नुसार स्थायी समिती व महानगरपालिकेच्या मंजूरीने शासनास प्रस्ताव पाठविणें आवश्यक आहे.तरी त्याप्रमाणे निर्णयासाठी सादर.

यावर मा.उपायुक्त (सामान्य) यांचा शेरा की, ''समक्ष चर्चेनुसार वरीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे. निर्णयासाठी शिफारस आहे.''

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, ''उपरोक्त कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन केले. महानगरपालिकेचे बांधकाम (पवडी) पाणीपुरवठा व नगररचना विभागात अभियंत्याची मंजूर पदसंख्या कमी व अपुरी आहे. मनपाचे कामात गतिमानता,कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाचे दृष्टीने बांधकाम (पवडी) मध्ये शासनाचे सार्व.बांध.विभागाकडून अनुभवी व कार्यक्षम ४ कनिष्ठ अभियंते,पाणी पुरवठा विभागात म.जि.प्र.कडून ३ अनुभवी व कार्यक्षम आणि नगररचना विभागात कुशल ३ स.न.र. संचालक, नगररचनाकडून मंजूर वेतनश्रेणीमध्ये प्रतिनियुक्तीवर घेणेस मान्यता देणेस हरकत नाही. सदरचे पदांना तात्पुरती पदनिर्मिती " Stop gap arrangement " म्हणून मान्यता देऊन शासनाचे मान्यतेस सादर करणे संयुक्तीक वाटते.''

यावर मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-२००४ की, '' अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम पाणीपुरवठा व नगररचना विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याची मंजूर पद संख्या अपुरी पडत असल्याने महानगरपालिकेचे कामात गतीमानता कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाच्या दृष्टीने अहमदनगर महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवर १) बांधकाम विभागाकरीता चार कनिष्ठ अभियंत्याची पदे २) पाणीपुरवठा विभागाकरीता तीन कनिष्ठ अभियंत्याची पदे ३) आरोग्य विभागाकरीता (कृषी अधिकारी) कनिष्ठ अभियंत्याची दोन पदे व ४) नगररचना विभागाकरीता सहाय्यक नगररचनाकार यांची तीन पदे याप्रमाणे एकूण बारा पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर पदावर अ.नं.एक साठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे चार कनिष्ठ अभियंते अ.नं.२ साठी शासनाच्या पाटबंधारे किंवा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे तीन अभियंते अ.नं.तीन साठी शासनाच्या आरोग्य विभागाचे कनिष्ठ अभियंते किंवा बी.टेक.(कृषी) ही शैक्षणीक पात्रता धारण करणारे अभियंते किंवा शासनाच्या कृषी सेवा वर्ग २ चे अधिकारी व अ.नं.चार करीता सहाय्यक नगररचनाकार दर्जाचे व मुल्यनिर्धारण विभागाचे अधिकारी तात्पुरते प्रतिनियुक्तीवर घेण्यास व त्यानंतर टप्प्याटप्प्याने याजागी कायम भरतीची प्रक्रिया पार पाडणेस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेमध्ये चीफ अकौन्टंन्ट ॲण्ड फायनान्स ऑफिसर चे पद निर्माण करण्यास व सदर जागी प्रतिनियुक्तीवर तात्पुरती नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठरावास मा.श्री.जाधव कृ.द., मा.श्री.कोतकर भा.ए., मा.श्री.पवार ना.शा., मा.श्री. जगताप नि.वि., मा.श्री.शेख सु.लि. सदस्य स्थायी समिती यांचा विरोध. ''

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.स्थायी समितीचे ठरावासह मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

मा.खास सभेतील चर्चा :-

मा.श्री.आगरकर : कॅफो पोस्ट भरण्यांत आलेली नाही.विषय घेतला असतांना कॅफोबाबतचा ठराव का आलेला नाही.यावर मा.उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की,स्थायी समिती मध्ये झालेला ठराव जशाच्या तशा पुढे आलेला आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव : पद निर्माण करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

मा.श्री.कैलास गिरवले : सिव्हील इंजि.ची पात्रता काय आहे.सि.इ.यांना फार मोठी कामे आहेत असे नाही.आणखी भरती करुन नाहक खर्च का वाढविता.

मा.वर्षा अरिफ : आमची कामे होत नाही.आम्हांला माहिती मिळत नाही.श्री.आहिरे सिटी इंजि.आम्हांला माहिती देत नाही.यावर आहिरे यांनी खुलासा केला.

मा.श्री.दिप चव्हाण : प्रशासनांतील कर्मचा-यांवर १.५० कोट खर्च होतात.कुठलेही इंजि.हे साईटवर जात नाही.आहे त्याच इंजिनिअरला काम नाही.तेंव्हा १२ जादा अभियंत्यांची आवश्यकता आहे काय ? १२ लोकांच्या पगाराची अंदाजपत्रकात तरतुद केलेली नाही.सध्या श्री.मगर आणि बडवे सि.इं.यांना काम नाही.

नगरपालिकेचे मनपात रुपांतर होऊन दोन वर्षे झालीत.अद्याप स्टापिंग पॅटर्न झालेला नाही.स्टापिंग पॅटर्नचे काम का थांबलेले आहे.तरी स्टॅपिंग पॅटर्नचे काम पुर्ण करावे व कार्यक्षम कर्मचा-यांना प्रमोशन देण्यांत येईल.प्रत्येक वरीष्ठ पोस्ट वरील कर्मचारी हे दिलेल्या पोष्ट वर काम न करता इतरत्र काम करीत आहे. व खालच्या केडरच्या कर्मचा-यांना वरीष्ठ केडरचे काम दिले जाते.

त्यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की,स्टॅपिंग पॅटर्नचे काम ३ ते ४ आठवडयात संपुन जाईल तेंव्हा मे किंवा जुनच्या सभेपुढे सदरचा आराखडा ठेवला जाईल.

मा.श्री.अनंत जोशी : मनपात किती कर्मचारी आहेत याची खडी तालीम घेण्यांत यावी.

मा.महापौर : यांनी सुचना दिल्या की,जे कर्मचारी ज्या मुळ पदावर नेमलेले आहेत त्या पदावर त्यांना काम करण्यांबाबत सुचना देण्यांत याव्यात.

मा.श्री.आगरकर : स्टॅपिंग पॅटर्न झाला पाहिजे व त्याचा आग्रह धरला पाहिजे.सक्षम माणसे भरणे ही काळाची गरज आहे.

--*--

ठराव : ठरविण्यात येते की,महानगरपालिका अस्तित्वात आल्याने कार्यक्षेत्रातील जबाबदारी वाढली असून नागरी सुविधा देण्याचे दृष्टीने व प्रस्तावात नमूद केलेल्या आवश्यकतेचा विचार करता मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-०४ अन्वये पुढील पदे प्रतिनियुक्तीवर भरणेबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी मा.शासनाकडे पाठविणेत यावा. १) अभियंता = पदे १२, २) मुख्य लेखा व वित्त अधिकारी = पद १.ठराव सर्वानुमते मंजूर.तद्नुषंगीक खर्च मंजूर.सुचक : मा.श्री.अभय आगरकर अनुमोदक : मा.श्री.नामदेव पवार

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : १८ - ३ - २००५

==========================================================================

प्रस्तावाचा विषय : श्री.गोरक्षनाथ द.दरवडे यांच्या नेमणुकी बाबत मा.स्थायी समिती यांनी मंजुर केलेले प्रकरण अखेर मा.महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : आस्थापना सुचिवरील लॅब्रोटरी टेक्निशियन या रिक्त असलेल्या पदावर श्री.दरवडे यांची नियुक्ती करणें बाबतचा प्रस्ताव मा.शासनांकडे पाठविण्यांत आला होता. त्यावर मा.उपसचिव,नगरविकास विभाग मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.ए १००३ / २२८३ / प्र.क्र.२९४ / ०३ / न - २४ दि.१९-४-०४ अन्वये सदर प्रकरणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये कार्यवाही करावी असे कळविण्यांत आलेले आहे.

सदर पत्राचा विचार करता मनपा अधिनियमाप्रमाणे नेमणुक देणे झाल्यास सेवायोजन कार्यालय यांचेकडुन नांवे मागवुन अथवा जाहिरातीद्वारे अर्ज मागवुन नेमणुक करता येईल.परंतु श्री.दरवडे हे हंगामी कामगार असल्यांने व मा.न्यायालयाच्या निर्णयाचा विचार करुन विशेष बाब म्हणुन नेमणुक देणेबाबत मा.शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता.

सदर बाबत परत श्री.दरवडे यांनी दि.१६-८-०४ रोजी मा.आयुक्त सो.यांची भेट घेवुन नेमणुक देणें बाबत विनंती केली. सदर बाबत मा.उपसचिव नगरविकास विभाग यांचेशी दुरध्वनी वरुन चर्चा केली असता परत प्रस्ताव पाठवावा असे सुचित केले आहे. त्याप्रमाणे सोबत प्रस्ताव सादर केला आहे. श्री.दरवडे यांनी दि.२४-८-०४ पासुन कुटुंबियासह उपोषणाची नोटीस दिली आहे.

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय की,मुख्य अधिनियमातील कलम ५३ ( १ ) नुसार रु. ४०० पेक्षा जास्त वेतन घेणां-या नेमणुकांसाठी महानगरपालिका सक्षम आहे. तथापि श्री.दरवडे यांच्या बाबतीत अशा आशयाचा ठराव झालेला नाही. उलटपक्षी श्री.दरवडे यांचा नेमणुकीचा प्रस्ताव शासनांस पाठविण्यांबाबत प्रशासकिय ठराव झाला असुन त्याप्रमाणे प्रस्ताव पाठविला असता शासनाने मनपा स्तरावर निर्णय घेण्यांचे निर्देश दिले आहे.

श्री.दरवडे यांचे संपुर्ण प्रकरण पाहता त्यांना लॅब असिस्टंट या कायम पदावर तात्पुरत्या स्वरुपात पुन्हा पुन्हा नियुक्त्या दिलेल्या असुन औद्योगिक न्यायालयाने त्यांना कायम सेवेत घेण्यांचे निर्देश दिलेले आहेत. तत्कालीन नगरपरिषदेने मा.संचालक,नगरपरिषद प्रशासन मुंबई यांचे निर्देशानुसार मा.उच्च न्यायालयात अपिल केले असले तरी न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाचे आदेशास स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे औद्योगिक न्यायालयाचे आदेश कायम असुन तत्कालीन नगरपरिषद व आजची मनपा यांनी आज अखेर या आदेशाचे अनुपालन करणे शक्य न झाल्याचे दिसुन येते.

श्री.दरवडे यांनी यापुर्वीच अवमान याचिका २१ / ०१ मा.औद्योगिक न्यायालयात दाखल केलेली आहे. श्री.दरवडे यांनी सेवेत नेमणुकीसाठी यापुर्वी उपोषण केले असुन पुन्हा दि.२४-८-२००४ पासुन उपोषणाची नोटीस दिलेली आहे.

शासनांस प्रशासकिय ठरावानुसार पाठविलेला प्रस्ताव व त्यास शासनांकडुन प्राप्त दि.१९-४-२००४ चे उत्तर विचारात घेता श्री.दरवडे यांना कलम ५१ ( १ ) नुसार मनपाच्या मंजुरीने नेमणुक देणे आवश्यक आहे. त्यांना तात्पुरती सहा महिन्यांपर्यंत नेमणुक देवुन पुढे पुन्हा विचारार्थ मनपाकडे पाठविण्यांची कार्यवाही करावयाची असल्यास नेमणुकीपुर्वी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

श्री.दरवडे यांनी वेळोवेळी दाखल केलेले दावे व अवमान याचिका विचारात घेता न्यायालयातील प्रलंबित अपिलाचे अधिन राहुन नियुक्ती देणे आवश्यक वाटते. त्यामुळे मा.स्थायी समितीकडे उचित निर्णयासाठी सादर.

यावर मा.सभापती स्थायी समिती यांचा अभिप्राय की,'' तात्पुरती नेमणुक देण्यांत यावी याबाबत कार्योत्तर मंजुरी घेण्यांत येईल. ''

श्री.गोरक्षनाथ द.दरवडे यांच्या नेमणुकी बाबतचे प्रकरण मा.स्थायी समिती समोर ठेविले असता त्यावर मा.स्थायी समिती ठराव क्र.११ दि.२९-११-२००४ नुसार ठराव की, '' अहमदनगर महानगरपालिके मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (१) नुसार श्री.गोरक्षनाथ दत्तात्रय दरवडे यांना लॅब असिस्टंट या कायम पदावर तात्पुरती नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर. अखेर मंजुरी साठी मा.महानगरपालिका सभे कडेस सादर.

सदर ठरावास मा.श्री.जाधव कृ.द.,मा.श्री.कोतकर भा.ए.मा.श्री.पवार ना.शां.,मा.श्री.जगताप नि.वि.,मा.श्रीमती.शेख सु.लि.सदस्य,स्थायी समिती यांचा विरोध.

सुचक - मा.श्री.कानडे अ.ना.  अनुमोदक - मा.श्री.साठे म.द.

ठराव बहुमताने मंजुर.

सबब श्री.गोरक्षनाथ दत्तात्रय दरवडे यांचे नेमणुक प्रकरण मा.स्थायी समितीचे मंजुरीसह मा.खास सभेपुढे अखेर मंजुरीस्तव सादर.

-- * --

मा.खास सभेतील चर्चा :-

मा.श्री.कृ.द.जाधव : - या प्रस्तावा बरोबरच श्री.इथापे यांची केस का घेतली नाही.श्री.इथापे हे कार्यक्षम अधिकारी असतांनाही व केस सारखी असतांनाही श्री.इथापे यांना मानधनावर घेतलेले आहे.श्री.इथापे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिका-यांवर अन्याय नाही काय यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की,रिक्त पदावरच नेमणुकीचा प्रस्ताव ठेवण्यांत आलेला नाही.श्री.इथापे यांच्याकरीता रिक्त पद नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- यांनी ऑफिस प्रस्ताव वाचण्यांस सुचविले व सांगितले की,नं.३३ / ९९ रिट पिटीशन सरसकट लागु आहे.श्री.दरवडे यांना तात्पुरती ऑर्डर दिलेली आहे.ऑर्डर बेकायदेशीर आहे.तीन महिन्याकरीता ऑर्डर दिलेली आहे.मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की,मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५१ ऐवजी ५३ (१) चा रिपोर्ट दिलेला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण : यावर स्थायी समिती ठराव मंजुर.

मा.श्री.आगरकर : महासभेला दुरुस्ती करण्यांचा अधिकार आहे.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.दरवडे यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ ( १ ) नुसार लॅब टेक्निशियन या पदावर कायम नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.सुचक : मा.श्री.अभय आगरकर अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके ठराव बहुमताने मंजूर.

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय :_ अहमदनगर महानगरपालिके मध्ये दि.१-२-२००५ रोजी निवड समितीच्या समोरील मागासवर्गीय अनुशेष व खुल्या प्रवर्गातील भरती अंतर्गत निवड करण्यांत आलेल्या उमेदवारांची यादी अखेर मंजुरीस.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.बी सी सी - २००२ / १३०६ / १६ ब दिनांक १७ मे २००४ च्या आदेशानुसार अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विमुक्त जाती भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांची सरळसेवा भरती व पदोन्नतीची अनुशेषाची रिक्तपदे भरणें बंधनकारक असल्यांने सदर पदे भरण्यांची प्रक्रिया सातत्याने सुरु ठेवणें बाबत इकडेस कळविण्यांत आलेले होते.

अहमदनगर महानगरपालिके मधील सध्या रिक्त असलेल्या पदांचा खालीलप्रमाणे अनुशेष दिसुन येतो.

| अ.नं. | पदांचे नांव | रिक्त पद संख्या | अनु. जाती | अ. जमाती | विजा भज | वि.मा .प्र. | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेडी ऑफिसर ( नवि + तोफ + जिजा.) | २ | -- | -- | | -- | १ | -- | २ |
| २ | लेडी डॉक्टर इन्चार्ज बा.दे.दवा | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| ३ | लेडी डॉक्टर | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| ४ | डॉक्टर | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| ५ | मिडवाईफ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| ६ | ड्राप्समन | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| ७ | सॅनि वर्क्स मिस्त्री | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| ८ | वेल्फेअर वर्कर पुरुष | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |

वरील पदांच्या भरती करण्यांसाठी शासन निर्णय दिनांक १९ नोव्हें.२००३ नुसार दैनिक वर्तमान पत्रातुन जाहिरात देवुन तसेच जिल्हा सेवा योजन अधिकारी,अ.नगर व पुणे यांचेकडुन उमेदवारांची यादी मागविण्यांत आली होती.

जाहिरातीनुसार आलेले अर्ज व सेवा योजन कार्यालयाकडुन आलेल्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन गुणपत्रकांच्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार मेडिकल ऑफिसर ,डॉक्टर व मिडवाईफ या पदांसाठी एकुण २९ उमेदवारांच्या मुलाखतीसाठी अंतिम यादी तयार करण्यांत आलेली होती.

वरील जाहिराती मध्ये ड्राप्समन या पदास म.न.पा.तील कर्मचारी श्री.किरण लक्ष्मण फाकटकर,ट्रेसर यांनी न्यायालयात हरकत घेतल्यामुळे न्यायालयाचा सदर पदांबाबत जैसे थे आदेश प्राप्त झाल्यामुळे सदर पद भरणें बाबत कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तसेच सॅनि.वर्क्स शॉप मिस्त्री या पदांकरीता आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव याबाबत स्पष्ट बोध होत नसल्यामुळे सदरचे पद भरणें बाबत कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्याचप्रमाणे वेलफेअर वर्कर ( पुरुष ) या पदास शासनामध्ये एम.एच.डब्ल्यु ही शैक्षणिक पात्रता निश्चीत करण्यांत आलेली असल्यामुळे या पदांची शासनाच्या पदांशी तुलना करुनच भरती करणेंची प्रक्रिया पार पाडावी लागेल त्यामुळे सद्यस्थितीचा विचार करता सदरचे पद भरणें बाबत कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

वरील तीन पदे वगळता उर्वरित सहा पदांसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ५४ ( १ ) नुसार खालील निवड समितीचे सदस्य हजर होते.

१.मा.आयुक्त तथा अध्यक्ष

२.मा.जिल्हा समाज कल्याण अधिकारी तथा सदस्य

३.मा.जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तथा सदस्य

४.मा.उपायुक्त ( सामान्य ) तथा सदस्य

५.मा.मुख्य लेखा परिक्षक तथा सदस्य

६.विभाग प्रमुख तथा सदस्य

७.महिला अधिकारी  तथा सदस्य

वरील निवड समितीने दिनांक १-२-२००५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता मा.आयुक्त कार्यालय यांचे दालनांत उमेदवारांची मुलाखत घेण्यांत आली असता सदर मुलाखतीस खालील नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांची संख्या उपस्थित होती.

| अ.नं. | पदांचे नांव | राखीव प्रवर्ग | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मेडिकल ऑफिसर ( बा.दे.दवा.लेडी डॉ.इन.) | खुला | ५ |
| २ | डॉक्टर | इमाव | ४ |
| ३ | मेडिकल ऑफिसर (जि.दवा.) | विजाभज ( ब ) | ४ |
| ४ | लेडी डॉक्टर | अनु.जाती | ४ |
| ५ | मेडिकल ऑफिसर ( न.दवा.) | इमाव | १ |
| ६ | मिडवाईफ | अनु.जाती. | ५ |

वरील उमेदवारांमधुन मुलाखत घेऊन पात्र अशा खालील उमेदवारांची निवड करण्यांत आली आहे.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पदांचे नांव | वेतनश्रेणी | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पाटील वृषाली प्रभास | मेडिकल ऑफिसर ( बा.दे.दवा.लेडी डॉ.इन.) | ८०००-१३५०० | खुला |
| २ | डॉ.सतीष बाबुराव राजुरकर | डॉक्टर | ८०००-१३५०० | इमाव |
| ३ | डॉ.पेठकर तृप्ती विलासराव | मेडिकल ऑफिसर (जि.दवा.) | ८०००-१३५०० | विजाभज ( ब ) |
| ४ | डॉ.शोभा रंगनाथ कांबळे | लेडी डॉक्टर | ८०००-१३५०० | अनु.जाती |
| ५ | डॉ.हंबिरे भाग्यश्री दयानंद | मेडिकल ऑफिसर ( न.दवा.) | ८०००-१३५०० | इमाव |
| ६ | पटेकर शितल छबन | मिडवाईफ | ३०५०-४००० | अनु.जाती. |

तरी वरील उमेदवारांना अ.नगर महानगरपालिकेमध्ये त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या वेतनश्रेणीवरील पदांवर नेमणुक आदेश बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ नुसार निवडसुचीस मा.महासभेची मंजुरी घेऊन नियुक्ती देणें आवश्यक आहे. तरी महासभेकडे विनम्र सादर करणेंसाठी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,प्रस्तावित निवड यादीस तसेच मेडिकल ऑफिसर जिजा.दवाखाना या पदाव्यतिरिक्त उर्वरित पदांचेसाठी प्रत्येक पदास एक याप्रमाणे गुणवत्तेनुसार प्रतिक्षायादीलाही मान्यता देणेंस हरकत नाही.

--

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा ) यांचे अभिप्रायासह,मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्राया सह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--- * ---

मा.खास सभेतील चर्चा :-

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिकेच्या ठरावाच्या मंजुरीची गरज आहे काय ?
मा.श्री.सुरेश शेळके :- नियमानूसार मंजुर.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्टानुसार अखेर मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिप चव्हाण.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके. ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय : शासन निर्णय क्र.अकंप/१०९३/२३३५/प्र.क्र.-९०/९३/८, दि.२६-१०-१९९४ अन्वये शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या / बेपत्ता झालेल्या / वैद्यकीय कारणास्तव सेवा -निवृत्त केलेल्या कर्मचा-यांच्या एका वारसास अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याच्या प्रस्ताव मंजूरीस्तव.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : उपरोक्त विषयांनुसार अहमदनगर महानगरपालिकेतील कायम आस्थापना सुचीवरील जे कर्मचारी सेवेत असतांना मयत झालेले आहेत अशा कर्मचा-यांच्या वारसांना दिनांक २६-१०-१९९४ च्या परिपत्रकानुसार अनुकंपा तत्वानुसार वारस नोकरी मिळणेंसाठी विनंती केलेली आहे.

वर्ग ३ व वर्ग ४ मधील जे कर्मचारी सेवेत असतांना मयत झालेले आहे त्यांची सेवाजेष्ठता सुची बनविण्यांत आलेली असुन ती सोबत जोडलेली आहे. कायम आस्थापना सुचीवर वर्ग - ४ मध्ये खालील प्रमाणे पदे रिक्त आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम बिगारी | १ पद |
| २ | गार्डन वॉचमन | १ पद |
| ३ | गार्डन कमिटी शिपाई | १ पद |
| ४ | वॉर्ड बॉय | १ पद |
| ५ | मंजुर ( प्राधिकरण ) | ९ पदे |
| ६ | उद्यान बिगारी ( उप कार्या.) | १ पद ( केडगांव विभाग ) |

असे एकुण १४ पदे रिक्त.

सोबत जोडलेल्या सेवाजेष्ठता ( सुची वरील ) यादी क्रमांक मधील अ.नं.१ ते ३ व अ.नं.५ व अ.नं.९ ते ११ यांच्या वारस प्रकरणां सोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्यामुळे त्यांचा विचार करणे उचित वाटत नाही. अ.नं.४ व ७ ते ८ व १२ ते १४ यांचे अनुकंपा तत्वानुसार वारस प्रकरणा सोबत आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेले आहे. ( सोबत प्रत्येक वारसाचे अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी स्वतंत्र प्रस्ताव ठेवण्यांत आलेला आहे. )

सदर स्वतंत्र प्रस्तावानुसार व वरील वर्ग - ४ मधील रिक्त पदे पाहता संबंधितांना दि. २६-१०-१९९४ च्या परिपत्रकानुसार अनुकंपा तत्वावर वारस नोकरी देण्यांच्या प्रस्तावास मंजुरी मिळावी आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि.२६-१०-०४ च्या शासन निर्णयाप्रमाणे सोबतच्या तक्त्यातील अ.नं.४,७,८,१२,१३ व १४ या वारसांना अनुकंपा तत्वानुसार नोकरी देणें बाबतचे स्वतंत्र प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्याप्रमाणे नेमणुका देणेंस शिफारस आहे.तथापि आदेशार्थ.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की,समक्ष चर्चेनुसार अनुकंपा लाभासाठी पात्र व परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त कर्मचा-यांच्या यादीसह फेरसादर करा.

यावर आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की,सोबतच्या यादीत नमुद केलेल्या १४ प्रकरणांपैकी केवळ ६ प्रकरणांमध्ये अनुकंपा तत्वावर नेमणुकीसाठी कागदपत्रांची पुर्तता करण्यांत आलेली आहे.त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | मयत कर्मचा-यांचे नांव | अर्जदाराचे नांव | अर्जदाराची शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कै.पेत्रस लक्ष्मण भाकरे | पोपट पेत्रस भाकरे | ५ वी पास | मुलगा |
| २ | कै.शिवाजी किसन सोनवणे | रविंद्र शिवाजी सोनवणे | आठवी | मुलगा |
| ३ | शेख इस्माईल अली महंमद | शेख शबाना ईस्माईल | १२ वी | पत्नी |
| ४ | कै.ताराचंद मारुती विधाते | मारुती ताराचंद विधाते | १० वी | मुलगा |
| ५ | कै.पोपट हरिभाऊ शिंदे | मंगला पोपट शिंदे | ६ वी | पत्नी |
| ६ | कै.साळवे अशोक विश्वनाथ | विकास अशोक साळवे | १२ वी | मुलगा |

वरील सर्व प्रकरणांची छाननी करण्यांत आली असून संबंधित व्यक्ती अनुकंपा नेमणुकीसाठी पात्र आहेत त्यांचे नेमणुकीसाठी शिफारस आहे.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, अनुशेषा बाबत तपशिल नमुद करुन फेरसादर करा.

यावर आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की, बिंदू नामावली रोस्टर पहाता वर्ग ४ मधील बिगारी / वॉचमनसाठी खालील प्रमाणे अनुशेष दिसुन येतो.

| अ.जा. | अ.ज. | वि. जा. भ. ज. | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | अ. ब. क. ड. | | | |
| ४ | ११ | ७ ५ ५ ४ | १ | ५ | ४२ |

१.अ.नं. ७ श्री.रविंद्र सोनवणे यांची नेमणुक केल्यास इमाव चा १ चा अनुशेष कमी होतो.
२.अ.नं.८ श्रीमती.शबाना शेख यांची नेमणुक केल्यास कुठलाही अनुशेष कमी होत नाही.
३.अ.नं.१२ मारुती विधाते यांची नेमणुक केल्यास अनु.जातीचा १ ने अनुशेष कमी होतो.
४.अ.नं.४ पोपट भाकरे व अ.नं.१३ हे कर्मचारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण येथे नेमणुका देणेंचे झाल्यास त्यांचे बिंदू नामावली रोस्टर तयार करण्यांत आलेला नाही.तसेच अ.नं.१४ मंगला पोपट शिंदे यांची केडगांव उप कार्यालय येथे नेमणुक देण्यांचे झाल्यास सदर उप कार्यालय महानगरपालिकेकडे वर्ग झालेले आहे.त्यांचेही बिंदू नामावली रोस्टर तयार करण्यांत आलेले नाही.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, वर तक्त्यात नमुद केलेला अनुशेष विचारात घेता मुळ अहवालात नमुद केलेली रिक्त पदे कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित आहेत ? आरक्षणानुसार नेमणुका देणें शक्य आहे काय ? याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा.

यावर आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेली रिक्त पदे ही खालील आरक्षित प्रवर्गातील दिसुन येतात.

१.बांधकाम बिगारी - अनुसुचित जाती
२.गार्डन कमिटी व गार्डन वॉचमन - खुल्या प्रवर्गातील
३.वॉर्डबॉय अटेंडंट / शिपाई - विशेष मागास प्रवर्गक

तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणां कडील मंजुर ९ पदे व केडगांव उपकार्यालय कडील १ पद याबाबतचे आरक्षण रोस्टर तयार करणें बाबतची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे सदर पदाचे आरक्षण दर्शविण्यांत आलेले नाहीत.

वरील शिपाई व बिगारी यांचा सध्या शिल्लक असलेला अनुशेष खालील प्रमाणें.

| अ.नं. | संवर्गाचे नांव ( पदाचे नांव ) | अजा | अज | विजा अ | विजा ब | विजा क | भज ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिपाई | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | १० | २८ |
| | बिगारी / वॉचमन | ४ | ११ | ७ | ५ | ५ | ४ | १ | ५ | ४२ |

शासन निर्णय क्र.अ.क १००३ / प्र.क्र.२५ / २००३ / आठ मंत्रालय मुंबई दि.१३ जुन २००३ निर्णयाप्रमाणे ५ % पदे ही अनुकंपा प्रतिज्ञा सुचीतील क्रमानुसार शिफारशी करुन भरण्यांत यावीत. ही ५ % पदे भरतांना मागासवर्गीय किंवा अमागासवर्गीय असा भेदाभेद न करता प्रतिक्षा सुचीतील क्रमानुसारच भरण्यांत यावीत असे नमुद केलेले आहे. तदनंतर शासन निर्णय परिपत्रक क्र.अकंपा - १००३ / प्र.क्र.५९ / २००३ / आठ दिनांक ३० जानेवारी २००४ मध्ये क्र.३ नुसार हजेरी सहाय्यक आणि त्यानंतर अतिरिक्त संवर्गातील उमेदवारा नंतर अनुकंपा तत्वावरील उमेदवारांच्या प्राधान्यानें नियुक्त्या करावयाच्या असल्यांने संदर्भाधिन क्रमांक ६ येथील दिनांक १३ जुन २००३ च्या शासन निर्णयातील अनुकंपा धारकांच्या नियुक्तीकरीता जी ५ % पदाची मर्यादा विहीत केली होती ती मर्यादा आता रद्य करण्यांत येत आहे. त्यामुळे उपलब्ध रिक्त पदे अनुकंपा तत्वावरील उमेदवारांच्या नियुक्तीने भरण्यांस कोणतीही मर्यादा राहणांर नाही.असे नमुद केलेले आहे.

वरील अनुकंपा तत्वानुसार वारस प्रकरणांची छाननी करण्यांत आली असुन संबंधित व्यक्ती अनुकंपा नेमणुकीसाठी पात्र आहे.तथापि आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, वरील अहवालात नमुद केलेल्या दि.१३ जुन २००३ मधील ( अ.क्र.२ ) व दि.२० जानेवारी २००४ ( अ.क्र.३ ) अन्वये अनुकंपा तत्वावरील मुळ अहवालातील पात्र खालील ६ कर्मचा-यांच्या नियुक्तीसाठी शिफारस आहे.

| अ.नं. | निवृत्त / मयत कर्मचा-यांचे नांव | अनुकंपा लाभास पात्र व्यक्ती | कर्मचा-यांशी नाते |
|---|---|---|---|
| १ | कै.पेत्रस लक्ष्मण भाकरे | पोपट पेत्रस भाकरे | मुलगा |
| २ | कै.शिवाजी किसन सोनवणे | रविंद्र शिवाजी सोनवणे | मुलगा |
| ३ | शेख इस्माईल अली महंमद | शेख शबाना ईस्माईल | पत्नी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | कै.ताराचंद मारुती विधाते | मारुती ताराचंद विधाते | मुलगा |
| ५ | कै.पोपट हरिभाऊ शिंदे | मंगला पोपट शिंदे | पत्नी |
| ६ | कै. अशोक विश्वनाथ साळवे | विकास अशोक साळवे | मुलगा |

वरील प्रमाणे नियुक्तीस शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,कर्मचारी सेवेत असतांना मयाताचे वारसांनी अनुकंपा नोकरी मिळणें बाबत जे अर्ज सादर केले त्याची नोंदवही ठेवावी.तसेच संबंधितांस कुटुंबनिवृत्तीवेतन व इतर अनुज्ञेय रकमा दिल्या का याची माहिती घेऊन पात्र अर्ज फेरसादर करा.

यावर आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की,अनुकंपा नोकरी मिळण्यांबाबत जे अर्ज सादर केले त्यांची नोंदवही तयार केली असुन संबंधितांना खालीलप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन व इतर अनुज्ञेय रक्कमा दिलेल्या आहेत.

| अ.नं. | सेवा निवृत्त कर्मचा-यांचे नांव | मयत दिनांक | कुटुंब निवृत्ती वेतन | वारसाचे नांव | नाते | प्रथम अर्ज दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कै.पेत्रस लक्ष्मण भाकरे | १८-४-०१ | पेन्शन -- २९२३<br>स.ग्रॅज्यु. -- ९७५४१<br>प्रॉ.फंड -- ४४६१२ | पोपट पेत्रस भाकरे | मुलगा | २५-५-०१ |
| २ | कै.शिवाजी किसन सोनवणे | १५-८-०२ | पेन्शन -- ३२८९<br>स.ग्रॅज्यु. -- ९२८२५<br>प्रॉ.फंड -- ३४८४१ | रविंद्र शिवाजी सोनवणे | मुलगा | ८-१०-०२ |
| ३ | कै.शेख इस्माईल अली महंमद | ८-८-०२ | पेन्शन -- २५८७<br>स.ग्रॅज्यु. -- ३७२६० <br>प्रॉ.फंड -- २१९०३ | शेख शबाना ईस्माईल | पत्नी | २३-१०-०२ |
| ४ | कै.ताराचंद मारुती विधाते | २६-४-०४ | पेन्शन -- ३२८९<br>स.ग्रॅज्यु. -- ९८७५०<br>प्रॉ.फंड -- ४१३९४ | मारुती ताराचंद विधाते | मुलगा | २१-५-०४ |
| ५ | कै. अशोक विश्वनाथ साळवे | १-७-०४ | पेन्शन -- ३७४७<br>स.ग्रॅज्यु. -- ९६७५०<br>प्रॉ.फंड -- ३५७०६ | विकास अशोक साळवे | मुलगा | २१-७-०४ |
| ६ | कै.पोपट हरिभाऊ शिंदे | ९-५-०४ | -- | मंगला पोपट शिंदे | पत्नी | २८-७-०४ |

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, निर्देशानुसार पुर्तता करुन अहवालानुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,पात्र अर्जदारांची शैक्षणिक व इतर अर्हता विचारात घेऊन त्यांना कोणत्या रिक्त पदी नियुक्ती प्रस्तावित आहे हे नमुद करुन फेरसादर करा.

यावर आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की, अनुकंपा पात्र अर्जदारांची शैक्षणिक अर्हता विचारात घेता व सध्या वर्ग - ३ चे पद रिक्त नसल्यामुळे अर्जदाराच्या मागणी प्रमाणे सध्या रिक्त असलेले वर्ग - ४ च्या रिक्त पदावर नेमणुका देणें उचित वाटते.

| अ.नं. | अर्जदाराचे नांव | शैक्षणिक पात्रता | रिक्त पदनाम | आवश्यक पदाची शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | पोपट पेत्रस भाकरे | ४ थी पास | मजुर ( प्राधिकरण ) | ४ थी पास |
| २ | रविंद्र शिवाजी सोनवणे | ८ वी पास | वॉचमन बागखाते | ४ थी पास |
| ३ | शेख शबाना ईस्माईल | १२ वी पास | शिपाई बाग कमिटी | ४ थी पास |
| ४ | मारुती ताराचंद विधाते | १० वी पास | बिगारी बांधकाम विभाग | ४ थी पास |
| ५ | विकास अशोक साळवे | एफ.वाय.बी.कॉम | मजुर प्राधिकरण | |
| ६ | मंगला पोपट शिंदे | ६ वी पास | उद्यान बिगारी ( केडगांव उप विभाग ) | ४ थी पास |

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, अहवाला नुसार निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त ६ ( सहा ) पात्र अनुकंपा उमेदवारांना रिक्त पदी प्रस्तावित केलेप्रमाणे नियुक्ती देणेंस हरकत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा.) यांचे अभिप्रायासह,आस्थापना प्रमुख यांचे फेरसादर रिपोर्टासह व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--- * ---

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.संबंधितांस प्रोबेशनरी आदेश देण्यांत यावे.नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.दिप चव्हाण.अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर.ठराव सर्वानुमते मंजूर .

सही /-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय : श्री.संतोष अर्जुन शिंदे यांचा अनुकंपा तत्वानुसार वारस नोकरी मिळणें बाबतचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : उपरोक्त विषयानुसार अहमदनगर महानगरपालिकेकडे शासनांने नागरी हिवताप नियंत्रण योजना राबविण्यांसाठी वर्ग केली आहे. सदर योजना राबवितांना शासनांकडून महानगरपालिकेस १०० % अनुदान प्राप्त होते.

या योजना अंतर्गत असणांरे मलेरिया कर्मचारी कै.अर्जुन सोमाजी शिंदे हे दि.२१९२००३ रोजी मयत झालेले आहेत.त्यांच्या मयत नंतर सदर पद रिक्त झालेले आहे. त्याचा वारस म्हणुन त्यांचा मुलगा संतोष अर्जुन शिंदे यांनी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणें करीता दिनांक २३-१-२००४ रोजी अर्ज सादर केला आहे. त्याचे शिक्षण ४ थी असुन त्यांची नोंद वही तयार केली आहे. संबंधितांना खालील प्रमाणे रकमा अदा केलेल्या आहेत.

| अ.नं. | सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव | मयत दिनांक | कुटूंब निवृत्त वेतन | वारसाचे नांव | नाते | प्रथम अर्ज |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कै.अर्जुन सोमाजी शिंदे<br>हुद्या क्षेत्र कार्यकर्ता | २१-९-०३ | पेन्शन २८०७<br>स.ग्रॅज्यु ४०४४०<br>प्रॉ.फंड ३४१५५ | संतोष अर्जन शिंदे | मुलगा | २३-१-२००४ |

अर्जदार यांचे अनुकंपा तत्वावर रिक्त असलेले क्षेत्र कार्यकर्ता ( बिगारी ) या पदावर नेमणुक देणें उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की,आस्थापना प्रमुख यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे व वरील विषयांकिंत शासन निर्णया प्रमाणे कै.अर्जुन सोमाजी शिंदे यांचा वारस मुलगा श्री.संतोष अर्जुन शिंदे,मुलगा यांस अनुकंपा तत्वावर रिक्त असलेल्या पदावर नेमणुक देणेंस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्याप्रमाणे क्षेत्र कार्यकर्ता या पदावर ( रिक्तपदी ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सहमत.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्रायासह,मा.उपायुक्त ( सा.) यांचे अभिप्रायासह व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेवला.

--- * ---

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर,संबंधितांस प्रोबेशनरी आदेश देण्यांत यावे.नियमानुसार कार्यवाही करावी. सुचक : मा.श्री.मनेष साठे.अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके.ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामध्ये " राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदेत बहुसदस्यीय प्रभाग पध्दत रद्य करुन एक सदस्यीय प्रभाग पध्दत सुरु करणें बाबत " झालेले अधिनियम महासभेपुढे माहितीस्तव सादर.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : मा.राज्यपालांच्या संमती नुसार महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.१५ डिसेंबर २००४ रोजी प्रसिध्द केलेला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ मध्ये आणखी सुधारणा करण्यांकरीता अधिनियम.

१९४९ चा मुंबई ५९.१९५० चा मध्य प्रांत व व-हाड २.१९६५ चा महा ४०.

**ज्याअर्थी**,यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९नागपुर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ व महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे**,त्याअर्थी,**भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी,याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत येत आहे.:--

**१.** (१) या अधिनियमांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका ,नागपूर शहर महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी ( सुधारणा ) अधिनियम २००४ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ

(२)तो,राज्य शासन,राजपत्रातील अधिसुचनेद्वारे नियत करील अशा दिनांकांस अंमलात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा

**२.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ याच्या कलम ५ मधील पोट कलम ( ३ ) मध्ये " प्रत्येक प्रभाग कमीत कमी तीन " या शब्दप्रयोगाने सुरु होणां-या व " अदमासे तीच राहील ". या शब्दप्रयोगाने संपणां-या मजकुराऐवजी " म्हणजे ज्यायोगे,व्यवहार्य असेल तितपत,सर्व प्रभाग आटोपशीर क्षेत्रे होतील आणि प्रत्येक प्रभागातील व्यक्तींची संख्या अगदी अलिकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार अदमासे तीच राहील. प्रत्येक प्रभागातुन केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यांत येईल." हा मजकूर दाखल करण्यांत येईल. १९४९ चा मुंबई ५९

उपरोक्त महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण मध्ये प्रसिध्द करण्यांत आलेली शासन अधिसुचना दिनांक १-१-२००५ हा उक्त अधिनियमांच्या तरतुदी अंमलात येण्यांचा दिनांक म्हणुन नियत करीत आहे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट माहितीस्तव सादर.

--- * ---

ठराव : नोंद घेण्यांत येत आहे.

सही/-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १०                                                                 दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय : नित्यसेवा सोसायटी ते निर्मलनगर पर्यंतच्या रस्त्याला स्वर्गीय डॉ. ना. ज. पाऊलबुधे यांचे नांव देणें बाबत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : नित्यसेवा सोसायटी ते निर्मल नगर पर्यंतच्या रस्त्याला स्व.डॉ.नाथ ज.पाउलबुधे यांचे नांव देण्यांबाबत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ अहमदनगर चे सरचिटणीस यांनी दि.१०-१२-०४ रोजी अर्ज केलेला आहे.

डॉ.पाउलबुध्दे यांचे दि.२७-३-०४ रोजी अल्पशाा आजाराने निधन झालेले आहे. कै.पाउलबुधे यांनी नगरसेवका पासुन आमदारा पर्यंतची अनेक पदे भुषविली होती. त्याचप्रमाणे अनेक कामगार संघटना व शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत.राजकीय क्षेत्रात त्यांनी निःस्पृह योगदान दिलेले आहे. त्यांनी वसंत टेकडी भागात कामगारांसाठी नित्यसेवा वसाहत स्थापन केलेली आहे. त्यांनी केलेले भरीव कार्य चिरंतर स्मरणांत रहावे म्हणुन वरील रस्त्याला त्यांचे नांव द्यावे असे संस्थेने पत्र दिलेले आहे व तसा संस्थेचा ठराव जोडला आहे.

सदरच्या रस्त्याला नांव देण्यांचे रजिष्टर पाहता अद्याप कोणाचेही नांव दिलेले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूचि " ड " प्रकरण ११ ( २ ) अ नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिके मध्ये विहित असलेल्या कोणताहा रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देण्यांचा अधिकार महानगरपालिकेच्या मंजुरीने असल्यांने सदरचे प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे ठेवणें विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की,अहवाला नुसार विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांसाठी निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सहमत.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा.) यांचे अभिप्रायासह व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेवला.

--- * ---

मा.खास सभेतील चर्चा :-

डॉ.ना.ज.पाऊलबुध्दे यांचे नांव रस्त्यास देण्याबाबत या बाबत मा.कृ.ज.जाधव यांनी सुचविले की, माजी आमदार कै.डॉ.पाऊलबुध्दे यांचे कार्य मोठे आहे तेव्हा एखाद्या रस्त्यास नांव देऊन त्यांना छोटे करु नये. सबब सदरचा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

--*--

ठराव : “ तहकुब “ तहकुब ठराव बहुमताने मंजुर.सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव.अनुमोदक : मा.सौ.सविता मोरे.

सही /-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ११ दिनांक : १८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय :_ रेणावीकर कॉलनी ते पाईपलाईन रोड सावेडी येथील प्रमुख रस्त्यास कै.बंडोपंत कुलकर्णी हे नांव देणें बाबत मा.सर्वश्री अनंत जोशी,मिलींद गंधे,दशरथ शिंदे व सौ.राधा गुरुड यांची यादी व यावर ऑफिस रिपोर्ट.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : प्रतिभा कॉलनी व रेणाविकर कॉलनी येथील नागरिक व त्यांचे प्रतिनिधी डॉ.अ.द.काळे यांचा दि.८-१२-०४ रोजीचे अर्जानुसार अहवाल देण्यांत येतो की,कै.शरद बळवंत कुलकर्णी उर्फ बंडोपंत कुलकर्णी यांचे वास्तव्य हे सावेडी रेणाविकर कॉलनी हया भागात होते. त्यांनी तेथील भाग सुधारण्यांस बरेच परिश्रम केलेले आहे.त्यांनी प्रत्येक क्षेत्रात नागरिकांच्या प्रश्नांत लक्ष घालून सोयी करुन नागरिकांच्या हिताच्या गोष्टी साठी वेळप्रसंगी त्रीव्र आंदोलनही केले. व सदर भाग सुधारण्यांसाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे.

त्यांची आठवण कायम स्वरुपी राहण्यांसाठी सावेडी येथील प्रमुख रस्त्यास किंवा रेणावीकर कॉलनी ते पाईप लाईन रोड या भागास त्यांचे नांव द्यावे.

सदरच्या रस्त्याला नांव देण्यांचे रजिष्टर पाहता अद्याप कोणाचेही नांव दिलेले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूचि " ड " प्रकरण ११ ( २ ) अ नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिके मध्ये विहित असलेल्या कोणताहा रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देण्यांचा अधिकार महानगरपालिकेच्या मंजुरीने असल्यांने सदरचे प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे ठेवणें विषयी आदेशार्थ सादर.

यावर प्रभारी मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,शहर अभियंता यांचेकडील प्रस्तावा प्रमाणे मा.म.न.पा.सभेपुढे मंजुरीस्तव पाठविणें बाबत निर्णयास्तव.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की,अहवाला नुसार निर्णयास्तव सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट प्रभारी मुख्य लेखापरिक्षक यांचे अभिप्रायासह व मा.उपायुक्त ( सा.) यांचे अभिप्रायासह व पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेवला.

--- * ---

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.नियमानुसार कार्यवाही करावी.ठराव मंजुर .सुचक : मा.श्री.अनंत जोशी.अनुमोदक : मा.श्री.मिलिंद गंधे.

सही /-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक :१२ दि.१८ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय - सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना पुर्नसर्वेक्षणाची पूर्वतयारी करणेबाबतचा महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा आदेश माहितीस्तव.

प्रस्तावाचा मजकूर : मा.शासनाच्या आदेशान्वये नागरी भागात राबविण्यात येत असलेली केंद्र शासन पुरस्कृत सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना दि.१-१२-१९९७ पासून सुरु करण्यात आलेली आहे. शहरी भागातील दारिद्र रेषेची भावपातळी दरमहा दरडोई रुपये ५९१.७५ पैसे इतकी केंद्रशासनाकडून निश्चित करण्यात आलेली आहे. यानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये पुर्नसर्वेक्षण करावयाचे प्रस्तावित आहे. राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा मध्ये सर्वेक्षणाचे काम दि.३१ मे २००५ पुर्वी पूर्ण करावयाचे आहे. असा आदेश महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी आदेश क्रमांक : नपप्रसं/१४/ सर्वेक्षण/ २००३/२६४ मुंबई - ३० दि.२५ ऑक्टोबर २००४ अन्वये दिलेला आहे.

वरील आदेशातील मुद्दा क्रमांक २ प्रमाणे महानगरपालिका हद्दीतील घोषित / अघोषित झोपडपट्टया शहरातील जुने गांवठाण व कमी उत्पन्न गटांच्या वस्त्यामध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावयाचे आहे. व या व्यतिरिक्त असलेल्या भागामध्ये पुरेशी पुर्व प्रसिध्दी देऊन सर्वेक्षण करावयाचे आहे. या क्षेत्रातील कुटुंबे दारिद्र रेषेखालील असल्याबाबतचा अर्ज महानगरपालिकेकडे सादर करतील. त्यानंतर प्रत्यक्ष भेट देऊन प्रगणक प्रपत्र भरुन घेतील असे आदेशित केलेले आहे.

मुद्दा क्रमांक ३ प्रमाणे पुर्नसर्वेक्षण करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा नागरी विकास यंत्रणेची आहे.

मुद्दा क्रमांक ३ ब प्रमाणे महानगरपालिकेचे सुजयो योजनेचे कामकाज पाहाणारे उपायुक्त हे ''सर्वेक्षण अधिकारी'' म्हणून राहतील असे कळविले आहे. शहरातील सर्वेक्षणाची जबाबदारी संपूर्णपणे सर्वेक्षण अधिकारी यांची असेल. सर्वेक्षण अधिका-याने पुढील ३० दिवसात शहराच्या कोणकोणत्या भागामध्ये सर्वेक्षण करावयाचे आहे. आणि त्यात किती कुटुंबाचे सर्वेक्षण करावयाचे आहे. हयाबाबत अंदाज घ्यावा असे सुचित केलेले आहे. यामध्ये कुठलीही वस्ती वगळली जाणार नाही याबाबत दक्षता घेणेबाबत कळविले आहे. सर्वेक्षणाकरीता २००१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार लोकसंख्या गृहीत धरण्यात येऊन त्यामध्ये १०% वाढ गृहीत धरण्यात यावी, असे कळविले आहे.

मुद्दा क्रमांक ३ क प्रमाणे सर्वेक्षण अधिकारी यांनी एक ते दिड लाख लोकसंख्येसाठी एका क्षेत्रीय अधिका-याची नेमणूक करणेबाबत व हा अधिकारी महानगरपालिकेतील वॉर्ड ऑफिसर दर्जाचा असावा, असे आदेशित केलेले आहे.

वर उल्लेख केलेल्या आदेशासोबत परिशिष्ट १मध्ये नागरी भागातील दारिद्र रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्याबाबतचा प्रस्तावीत तपशिलवार कार्यक्रम यासोबत जोडलेला आहे.

परिशिष्ट - १ च्या प्रस्तावीत सर्वेक्षण कार्यक्रमानुसार सर्वेक्षण प्रपत्र भरण्याचा कार्यक्रम १५ एप्रिल २००५ ते १५ मे २००५ पर्यंतचा असून ३१ मे २००५ पर्यंत सर्वेक्षणाचे काम पुर्ण करुन राज्य नागरी विकास यंत्रणेस जिल्हानिहाय अंतिम अहवाल सादर करावयाचा आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने सदरचे सर्वेक्षण करणेकरीता योजनेचे कामकाज पाहणारे उपायुक्त श्री.एस.एल.लहाने यांची सर्वेक्षण अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. तसेच सदर सर्वेक्षणकामी क्षेत्रीय अधिकारी म्हणून १) श्री.आर.एम.ढाकणे - लेबर कम पर्सोनल ऑफिसर, २)

श्री.आर.ए.देशमुख - सहाय्यक आयुक्त सावेडी विभाग ३) श्रीमती.निलीमा बंडेलू - प्रसिध्दी अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

येणे प्रमाणे सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना पुर्नसर्वेक्षणाची पुर्वतयारी करणेबाबतचा महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा नगरपरिषद प्रशासन संचालनालयचा आदेश मा.खास सभेपुढे माहितीस्तव ठेविला.

--*--

ठराव : नोंद घेण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.सुचक : मा.श्री.अभय आगरकर
अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके.ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर .

शुक्रवार दि.१८-०३-२००५ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहांत
होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१) अहमदनगर शहराच्या पाणी पुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वारंवार येत असलेल्या नोटीसांबाबत ऑफिस रिपोर्ट.

२) महाराष्ट्र बायो फर्टिलायझर्स इंडिया प्रा.लि., अहमदनगर या खाजगी एजन्सीस मौजे बुरुडगांव
सर्व्हे नं.३४ (पैकी) या अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेवर ओल्या कच-या पासुन सेंद्रिय
जैविक खत निर्मिती प्रकल्प उभारणे व चालविणेस देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

३) अहमदनगर शहर मंजूर विकास योजनेनुसार म.गांधी रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत ऑफिस रिपोर्ट.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-२००४ - अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम पाणीपुरवठा व नगररचना विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याची मंजूर पदसंख्या अपुरी असल्याने म.न.पा.चे कामात गतीमानता कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाच्या दृष्टीने आस्थापनेवर जादा (१२) पदे निर्माण करुन त्या जागी प्रति नियुक्तीवर अभियंत्याची पदे भरणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

५) श्री.गोरक्षनाथ द.दरवडे यांच्या नेमणुकीबाबत मा.स्थायी समिती यांनी मंजुर केलेले प्रकरण अखेर मा.महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

६) अहमदनगर महानगरपालिकेमध्ये दि.१-२-२००५ रोजी निवड समितीच्या समोरील मागासवर्गीय
अनुशेष व खुल्या प्रवर्गातील भरती अंतर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी अखेर
मंजूरीस.

७) शासन निर्णय क्र.अकंप/१०९३/२३३५/प्र.क्र.-९०/९३/८, दि.२६-१०-१९९४ अन्वये शासकीय
सेवेत असताना दिवंगत झालेल्या / बेपत्ता झालेल्या / वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त केलेल्या
कर्मचा-यांच्या एका वारसास अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याच्या प्रस्ताव मंजूरीस्तव.

८) श्री.संतोष अर्जुन शिंदे यांचा अनुकंपा तत्वानुसार वारस नोकरी मिळणे बाबतचा अर्ज व त्यावरील
ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

९) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ या मध्ये ''राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदेत बहुसदस्यीय प्रभाग पध्दत रद्य करुन एक सदस्यीय प्रभाग पध्दत सुरु करणे बाबत '' झालेले अधिनियम महासभेपुढे माहितीस्तव सादर

१०) नित्यसेवा सोसायटी ते निर्मलनगर पर्यंतच्या रस्त्याला स्वर्गीय डॉ.ना.ज.पाऊलबुधे यांचे नांव
देणेबाबत सेवा शिक्षण प्रसारक मंडळ यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

११) रेणाविकर कॉलनी ते पाईप लाईन रोड,सावेडी येथील प्रमुख रस्त्यास कै.बंडोपंत कुलकर्णी यांचे

नांव देणे बाबत मा.सर्वश्री अनंत जोशी, मिलींद गंधे, दशरथ शिंदे व सौ.राधा गुरुड यांची यादी व यावर ऑफिस रिपोर्ट.

१२) सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना पुर्नसर्वेक्षणाची पूर्वतयारी करणेबाबतचा महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा आदेश माहितीस्तव.

१३) मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**खास सभा दि.१८-३-२००५ ची चर्चा.**

## <u>ठराव क्रमांक १ ची चर्चा दि.१८-३-०५.</u>

मा.श्री.कृ.द.जाधव - खास सभेचा उल्लेख केलेला आहे.नियम काय आहे.सभा कायदेशिर आहे काय ? फक्त खास सभेचे विषयच घ्यावयास पाहिजे.तसेच या सभेत मागील सभेचे कार्यवृत्त त्याचप्रमाणे दुखवटयाचे प्रस्ताव ठेवलेले नाही,त्यामुळे ही सभा बेकायदेशिर आहे असे वाटते.
महापौर - वीज पुरवठा बीला बाबत विशेष सभा घेतलेली आहे. महत्वाचे विषय घेतलेले आहे.सभा कायदेशिर आहे.
चर्चा पुढे चालू.
मा.श्री.त्रिपाठी - वीज बीला बाबतचा प्रश्न ३० वर्षापासुन चालु आहे.घाबरण्यांचे कारण नाही,मंत्रीस्तरावर बैठक घेण्यांत यावी.तत्पुर्वी २० लाख रु.वीजबील दरमहा भरण्यांचे ठरले होते.जीवन प्राधिकरण विभागाकडुन पाणीपुरवठा योजना ताब्यात घेतांना सावेडी भुयारी गटार योजना मार्गी लावण्यांबाबत ठरलेले होते. परंतु झाली नाही.सध्या कर्मचा-यांच्या पगाराला पैशे नसतात सदरचे पैशे भरण्यांसाठी कोठुन आणणांर त्याबाबत कमिटी नेमावी.कमिटी नेमुन त्याबाबतचा निर्णय घेण्यांत यावा.
मा.श्री.नामदेव पवार - युतीच्या काळामध्ये झालेल्या मिटींगचे वेळी थकबाकीचे बील माफ केलेले होते.पेपरमध्ये तसे छापून आले होते. त्याबाबत पत्रव्यवहार केला आहे काय.
त्याबाबत इंजिनिअर श्री.निकम यांनी खुलासा केला.
श्री.निकम - मिटींगचे इतिवृत्त आपल्याकडे आहे.बील माफ केलेले नाही व बजेट तरतूद केलेली नाही.
मा.आयुक्त - बील माफ होण्यांचा प्रश्न नाही.प्रस्तावात स्पष्ट नमूद केले आहे.थकबाकी भरणें आवश्यक आहे.माफ झालेले नाही.
मा.श्री.नामदेव पवार - याबाबतचे पैसे कसे भरणांर काय पर्याय आहे,तरतुद काय आहे व ठराव काय घेणांर.
मा.श्री.दिपक सुळ - दि.१७-२-२००५ रोजी झालेल्या बैठकी प्रमाणे जीवन प्राधिकरणांची जबाबदारी आहे.जीवन प्राधिकरणांने आपली फसवणूक केलेली आहे. व ब-याच अटींची पुर्तता केलेली नाही.
मा.आयुक्त - १९९९ पुर्वीची थकबाकी जीवन प्राधिकरणांने भरावयाची आहे. व त्यानंतरच्या थकबाकी बाबत मनपाची जबाबदारी आहे.
मा.श्री.दिप चव्हाण - शासनाचे डायरेक्शन काय आहे.कर्ज घेवून पैसे भरावे असे आहे काय ? अंतिम महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मंजुर नाही.कार्यवृत्त कायम करण्यांसाठी घेतलेले नाही. ५ लाख टोकन तरतुदीला मंजुरी नाही.बजेट मंजुर नसतांना अंतिम मंजुरी कशी घेणांर कर्ज घेणे योग्य आहे काय ? हा विषय बजेट मिटींग मध्ये का आणलेला नाही.ब-याच नगरपालिकांकडे वीज मंडळाची थकबाकी आहे.याबाबत एमएसईबीने कोणत्याही कोर्टामध्ये दाखल केलेले नाही.रिट पिटीशन फक्त अहमदनगर महानगरपालिकेकडे दाखल झालेला नाही.
कर्ज घेण्यांसाठी तरतुद केलेली नाही.बजेट मंजुर करुन अगोदर घ्यावे.व नंतरच विषय मंजुर करावा.कारण हा विषय बजेटशी निगडीत आहे.दि.१८-२-०५ च्या बजेट मिटींगचे प्रोसिडींग वाचुन दाखवावे. परस्पर मंजुर झाले आहे काय त्याचा खुलासा करावा.

हा विषय तहकुब ठेवुन बजेट मंजुर झाल्या नंतरच घ्यावा.

थकबाकी बाबत शासनाने परिपत्रक काढलेले आहे.हायकोर्टाचा निर्णय नाही माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथजी मुंडे यांचा निर्णय डावलला गेला आहे.त्यावेळस ठरलेल्या प्रमाणे दरमहा २० लाख रुपये भरत असतांना त्याचे आपण दरमहा ३० लाख रुपये केलेले आहे.व आता ७० लाख भरीत आहोत म्हणजे एक्स्ट्रॉ ४० लाख रुपये बील भरीत आहोत.

तरी बजेट मंजुर झाल्यानंतर विषय घेण्यांत यावा.

मा.श्री.कृ.द.जाधव - विषय मांडण्याअगोदर खुलासा होणें आवश्यक आहे.की कोणते विषय घ्यावयाचे किंवा कोणते विषय घ्यावयाचे नाहीत याबाबत पार्टीमिटींग मध्ये अगोदरच चर्चा झालेली असते. नंतरच जनरल सभेपुढे सदर विषय येतात.

महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजना ही वेगळी आहे.३२ कि.मि.वरुन पाणी आणावे लागते.२ ते ३ ठिकाणी पाणी लिफ्ट करावे लागते. नैसर्गिक पाणी येत नाही.म्हणुन महानगरपालिकेची स्पेशल केस म्हणुन शासन दरबारी प्रयत्न करावे.व विषय तहकुब न ठेवता शासनांकडे स्पेशल केस पाठवावी.शिष्टमंडळ शासनांकडे पाठवावे व सविस्तर शासन दरबारी प्रस्ताव मांडुन प्रयत्न करावा.व शासनांस आपली बाजु पटवून द्यावी.

मा.आयुक्त - याबाबत मा.प्रधान सचिव यांना माहिती दिलेली आहे. वीज बील भरणे आवश्यक असल्याचे शासनाने सांगितले आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव - यांनी पुढे सांगितले की,श्री.नामदेव पवार व श्री.कोतकर यांना शासन दरबारी शिष्ट मंडळात घेवुन जावे.

मा.श्री.दिप चव्हाण - पार्टी मिटींग मध्ये विषय ठरले जातात हे म्हणणे बरोबर आहे.तथापि पाटीमिटींग मध्ये एकमेकांची अंडरस्टँडिंग असते.मालेगांव ,नागपुर या ठिकाणी चुकीचे ठराव झाल्यामुळे नगरसेवकांवर कायदेशिर कारवाई झालेली होती.याची माहिती दिलेली आहे.कायद्याचा मुद्या महत्वाचा आहे.

मा.श्री.कैलास गिरवले - याबाबत सर्वपक्षिय झालेलया सभेमध्ये याबाबत जबाबदारी स्वीकारलेली आहे.तरी शासनांकडे प्रस्ताव मांडावा व प्रयत्न करावे.याबाबत शिष्ट मंडळामध्ये श्री.कोतकर श्री.भाऊ जाधव यांची समिती नेमावी.

मा.महापौर - थकबाकी बाबत समिती नेमुन शासनांकडे पाठपुरावा करुन बजेट मंजुर झाल्यानंतर चर्चा करु असे सांगितले.

मा.आयुक्त - विद्युत संजिवनी योजना ३१ मार्च २००५ पर्यंत असल्यामुळे तातडीने हा विषय चर्चेसाठी आणण्यांचे कारण आहे. त्यापुर्वी निर्णय झाला पाहिजे. याबाबतची जबाबदारी यानंतर मनपावर येणांर आहे. व नागरिकांनाही अडचण सोसावी लागणांर आहे.

मा.श्री.दिप चव्हाण -- मनपाने बील थकविलेले नाही.करंट बील भरत आहोत.थकबाकी बाबत वाद आहे.

मा.महापौर - मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सर्व पक्षिय समिती नेमुन याबाबत शासनांकडे पाठपुरावा करण्यांत यावा व तोपर्यंत विषय तहकुब ठेवावा असे सुचविले व बजेट मंजुर झाल्यानंतर विचार करु.

मा.श्री.अशोक कानडे - सदर विषयाबाबत विरोध नोंदवावा.याबाबतचे रुलिंग अध्यक्षांनी विचार करुन द्यावे.कर्ज घेण्यांबाबतचा विषय तहकुब ठेवावा.

मा.श्री.अभय आगरकर - या विषयाबाबतचे रुलिंग बाबत विचार करुन निर्णय द्यावा.एकदा तहकुब केलेला विषय तीन महिने घेता येणांर नाही.

मा.श्री.नामदेव पवार - वीज पुरवठा केंव्हाही खंडित होऊ शकतो तेंव्हा याबाबत काय निर्णय झाला.व्यवस्थित निर्णय घ्यावा.

मा.श्री.आसाराम कावरे - शासनांने कर्ज माफ करावे.पुणे महापालिकेकडुन कर्ज घ्यावे.

मा.आयुक्त - यांनी खुलासा केला सार्वजनिक पाणीपुरवठा जलसंजिवनी योजना ही नगरपालिका करीता मर्यादीत आहे. व ही थकबाकी जी आहे ती नगरपालिकेच्या वेळेची आहे.मा.प्रधान सचिव यांचेकडील मिटींगचे वेळी या योजनेचा फायदा महानगरपालिकेला घेता येईल किंवा कसे याबाबत सांगितले वरुन प्रस्ताव ठेवलेला आहे.व योजनेचा लाभ घेण्यांबाबतचा प्रस्ताव मांडलेला आहे.तेंव्हा या योजनेचा मनपाला लाभ घेता येईल.
मा.श्री.कानडे - यांनी विचारले की याबाबत मनपाकडे लेखी काही माहिती नाही काय ?
यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की,
मा.आयुक्त - विद्युत मंडळाची ही योजना आहे.सक्षम अधिकारी यांनी खुलासा याबाबत केलेला आहे.
मा.श्री.कानडे - मनपाची आर्थिक कोंडी करण्यांचा हा प्रयत्न आहे.जकात अनुदान बंद जिल्हाधिकारी यांनी शिक्षण व रोजगार हमी परस्पर कापुन घेतलेले अनुदान व बजेट मंजुरी नसतांना तेरा कोटी कर्ज घेण्यांचा सल्ला दिला जातो हे आर्थिक दृष्टया योग्य नाही.तरी मी विरोध करतो.प्रस्ताव रद्य करावा.
मा.श्री.सतिष मैड - यांनी जड वाहतुकी बाबतचा प्रश्न मध्ये उपस्थित केला.
मा.श्री.सुरेश शेळके - याबाबत श्री.अशोक बसाक यांचेकडे निर्णय झालेला होता.तरी याबाबत समिती नेमावी अशी विनंती केली.
मा.महापौर - विद्युत पुरवठा खंडित बाबतच्या आलेल्या नोटीसी वरचा प्रस्ताव तहकुब करुन सर्वपक्षिय समितीचे शासनांकडे शिष्ट मंडळ घेवुन जावे असे सुचविले.

## <u>विषय क्रमांक : २ सेंद्रिय जैविक खत निर्मिती प्रकल्प उभारणे व चालविणें.</u>

मा.श्री.उडाणशिवे : कच-या मध्ये ओला आणि सुका कचरा फार असतो.ओल्याबरोबर सुका कचरा जास्त येत असतो.१ वर्षापासुन दारिद्रय रेषेखालील लोकांनी ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यांसाठी जागा मागणी केलेली आहे.त्याबाबत २०० स्क्वे.फुट जागा कष्टकरी पंचायत समितीला देण्यांबाबतचा ठरावही झालेला आहे.परंतु अद्याप जागाही दिलेली नाही.याबाबत मनपावर खर्चाचा कोणताही बोजा नाही.उलट मनपाचा फायदाच आहे.तरी त्याबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती केली.
मा.सौ.मंगला गुंदेचा - खत प्रकल्पा बाबत अभ्यास होई पर्यंत विषय तहकुब करावा.
मा.श्री.अनंत जोशी - कमिटीचा अहवाल सभेपुढे ठेवावा.अहवाल आला नसतांना हा विषय अजेंडयावर का घेण्यांत आला.याबाबतचा आलेला अहवाल वाचावा. अहवाल अद्याप आलेला नाही असा महापौर यांनी खुलासा केला.
मा.श्री.आगरकर - समिती गठीत करतांना ती या सभेमध्येच करावयास पाहिजे तसे न करता आपल्या ऑफिस मध्ये समिती गठीत करता अशाप्रकारची कृती अपेक्षित नाही हे चुकीचे आहे.याबाबतचे उत्तर गांभिर्य पुर्वक मिळाले पाहिजे.समितीकडुन अहवाल आलेला नाही.अहवालावर निर्णय घेतलेला नाही.स्थायी समिती आयुक्त व सदस्य यांनी प्रोजेक्ट पहावा व कमिटीचा अहवाल घ्यावा.
मा.महापौर - पुन्हा एकदा जाऊन आल्यावर अहवाल द्यावा.
मा.श्री.कृ.द.जाधव - या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे.विषय पुढे घ्यावयाचा असे ठरलेले आहे.याबाबत समितीने जे पत्र दिलेले आहे ते वाचुन दाखवावे.सदरचे पत्र वाचुन दाखविण्यांत आले.
मा.श्री.दिप चव्हाण - सर्वोच्च न्यायालयाने सदर विषयाबाबत कालमर्यादा निश्चीत करुन दिलेली आहे. हा प्रोजेक्ट मनपा स्वत : का चालवित नाही.याबाबत कमिटीने सुध्दा अभ्यास केलेला आहे.आपण स्वत : प्रकल्प करावा.मनपात क्षमता नाही काय ?
मा.श्री.दिपक सुळ - सविस्तर माहिती श्री.मेहेत्रे यांनी द्यावी.
मा.श्री.कृ.द.जाधव - श्री.दिप चव्हाणी यांनी जी सुचना मांडली ती बरोबर आहे.

मा.आयुक्त - याबाबतची खत निर्मिती विक्री मनपाला जमणांर नाही.मार्केटींगचा विचार करु नका कच-याची विल्हेवाट लावण्यांची जबाबदारी मनपाची आहे.कंपनी मनपाकडे ट्रायलसाठी होती.मनपाकडुन गुणवत्ता व सेग्रीगेशन होत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - प्रयत्न करण्यांस काय हरकत आहे.मार्केटचा विचार करु नये .शेतकरी यांना खत फुकट द्यावे.स्वत : प्रोजेक्ट चालविण्यांचा विचार करावा.

मा.उपायुक्त श्री.लहाने - यांनी याबाबत खुलासा केला नुसत्या कच-यापासुन खत निर्मिती होत नाही.त्याला इतरही रॉ मटेरियल वापरावे लागते.मनपाला इतर रॉ मटेरियल सहजासहजी उपलब्ध होणांर नाही.

मा.श्री.आगरकर - माझे म्हणणे याबाबत वेगळे आहे.चर्चा करुन ठरविले असतांनाही त्याचा विचार केला नाही.याबाबत कंपनीने तीन प्रॉडक्ट केलेले आहे.मुलभूत कचरा मनपाचा आहे.

मा.श्री.कानडे - याबाबत निर्णय घाईने घेण्यांपेक्षा कमिटीने अभ्यास करुन निर्णय घ्यावा.

मा.महापौर - पुन्हा एकदा सर्व पक्षीय समिती पाठवुन अहवाल घेऊन निर्णय घ्यावा.

समिती

१.मा.श्री.कैलास गिरवले २.मा.श्री.उडाणशिवे ३.मा.श्री.कृ.द.जाधव ४.मा.श्री.आगरकर इ.सदस्य घेण्यांत यावे.व श्री.लहाने उपायुक्त हे समितीचे सदस्य राहतील.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर.सदरच्या प्रकरणांतील मा.सर्वोच्च न्यायालय यांचे आदेशाचा विचार करता सदरचे प्रकरणांबाबत पुढील उचित कार्यवाही करणे गरजेचे असुन यास्तव मा.सदस्य यांची " अभ्यास अहवाल समिती " गठीत करणेंत यावी. १.मा.श्री.कृष्णा द.जाधव २.मा.श्री.कैलास गिरवले ३.मा.श्री.अनंत जोशी ४.मा.श्री.भाऊसाहेब उडाणशिवे,

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.अभय आगरकर.

अनुमोदक : मा.श्री.कैलास गिरवले.

## विषय क्रमांक : ३ महात्मा गांधी रस्ता रुंदीकरणां बाबत.

मा.श्री.आनंद जोशी : विषय न्याय प्रविष्ट असतांना ठराव ४० फुटी रस्ता करणेंबाबत करावा काय ? मागील ठराव कायम करण्यांत यावा.

मा.श्री.सतीष मैड : सर्व रस्ता ४० फुट करावा.मागील ठराव कायम ठेवावा.शासनांकडे पाठवावा.

मा.श्री.सुरेश शेळके : ४० फुट रस्ता करण्यांस विरोधी नाही.४० फुट रस्ता करण्यांबाबत यापुर्वी मंजुर झालेला आहे.टी.पी.स्कीम नं.४ मध्ये रस्ता १९७८ ला ५० फुटी करणें बाबत मंजुर झालेला आहे. त्यास आता २५ वर्षे झालेली आहे.हा रस्ता ४० फुटी करावयाचा झाल्यास इतर रस्त्यांना हा फायदा देणांर काय ?

मा.श्री.नामदेव पवार : बाकी रस्त्याबाबत काही अडचण निर्माण होणांर आहे काय ?

मा.आयुक्त : शासन यावर अंतिम निर्णय घेणांर आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव : १९७६ पासुनचा हा विषय आहे.५० फुट रस्ता केल्यास नुकसान भरपाई द्यावी लागेल.४० फुट रस्ता केल्यास मनपाला खर्च येणांर नाही.४० फुट रस्ता करणें गरजेचे आहे.व्यापारी स्वत :च्या खर्चाने मागे घेण्यांस तयार आहे.

मा.श्री.संदिप कोतकर : ५० फुट रस्ता करण्यांमध्ये व्यापा-याचे नुकसान होणांर आहे.४० फुट रस्ता ठेवावा अशी मागणी केली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण : सन १९७८ पासुनचा हा रस्त्याचा प्रश्न आहे.नुकसान भरपाई बाजारभावाने द्यावी लागणांर आहे. व त्यासाठी रु.३ कोटीची प्रोव्हीजन करावी लागेल.मनपाला सध्या आर्थिक

ताण आलेला आहे.तो विचारात घेऊन सदरचा रस्त्याबाबतचा दुसरा व तिसरा टप्पा ४० फुट करणें तसे उच्च न्यायालयात कळविणे अशा बाबतचा ठराव यापुर्वी झालेला आहे.

न्यायालयातील अपीलाची मर्यादा संपलेली आहे.आलेली परिपत्रके व केलेले ठराव पाहिले असता व असे ठराव वारंवार येणांर नाहीत.जुना ठराव केला असतांना तो पाठविला जात नाही.४० फुट केल्यावर मनपाचा फायदा होईल. तरी ४० फुट रस्ता करण्यांबाबतचा प्रस्ताव मा.शासनांकडे पाठविण्यांत यावा.ठरावाच्या आधारे उर्वरित भाग व्यापारी काढुन घेतील.हायकोर्टातील अंतिम निकाल लागावयाचा आहे. नगरपालिका असतांना अशाबाबतचा ठराव पाठविला होता.तरी शासनाला ४० फुट रस्ता करण्यांबाबतचा ठराव पाठवावा.

मा.श्री.कैलास गिरवले : योग्य निर्णय घ्यावा असे सांगितले.हायकोर्टाने आदेश द्यावा.पैशाचा प्रश्न दरवेळी निर्माण होत आहे.त्यामुळे पुढील पिढी आपल्याला दोष देणांर आहे.

मा.महापौर - आर्थिक परिस्थिती पाहता ४० फुट रस्त्याबाबतचा ठराव पाठविण्यांत यावे असे सांगितले.

## विषय क्रमांक : ४ - अभियंत्यांची १२ पदे आस्थापनेवर निर्माण करणें बाबत.

मा.श्री.आगरकर : कॅफो पोस्ट भरण्यांत आलेली नाही.विषय घेतला असतांना कॅफोबाबतचा ठराव का आलेला नाही.यावर मा.उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की,स्थायी समिती मध्ये झालेला ठराव जशाच्या तशा पुढे आलेला आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव : पद निर्माण करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

मा.श्री.कैलास गिरवले : सिव्हील इंजि.ची पात्रता काय आहे.सि.इ.यांना फार मोठी कामे आहेत असे नाही.आणखी भरती करुन नाहक खर्च का वाढविता.

मा.वर्षा अरिफ : आमची कामे होत नाही.आम्हांला माहिती मिळत नाही.श्री.आहिरे सिटी इंजि.आम्हांला माहिती देत नाही.यावर आहिरे यांनी खुलासा केला.

मा.श्री.दिप चव्हाण : प्रशासनांतील कर्मचा-यांवर १.५० कोट खर्च होतात.कुठलेही इंजि.हे साईटवर जात नाही.आहे त्याच इंजिनिअरला काम नाही.तेंव्हा १२ जादा अभियंत्यांची आवश्यकता आहे काय ? १२ लोकांच्या पगाराची अंदाजपत्रकात तरतुद केलेली नाही.सध्या श्री.मगर आणि बडवे सि.इं.यांना काम नाही.

नगरपालिकेचे मनपात रुपांतर होऊन दोन वर्षे झालीत.अद्याप स्टापिंग पॅटर्न झालेला नाही.स्टापिंग पॅटर्नचे काम का थांबलेले आहे.तरी स्टॅपिंग पॅटर्नचे काम पुर्ण करावे व कार्यक्षम कर्मचा-यांना प्रमोशन देण्यांत येईल.प्रत्येक वरीष्ठ पोस्ट वरील कर्मचारी हे दिलेल्या पोष्ट वर काम न करता इतरत्र काम करीत आहे. व खालच्या केडरच्या कर्मचा-यांना वरीष्ठ केडरचे काम दिले जाते.

त्यावर उपायुक्त प्रशासन यांनी खुलासा केला की,स्टॅपिंग पॅटर्नचे काम ३ ते ४ आठवडयात संपुन जाईल तेंव्हा मे किंवा जुनच्या सभेपुढे सदरचा आराखडा ठेवला जाईल.

मा.श्री.अनंत जोशी : मनपात किती कर्मचारी आहेत याची खडी तालीम घेण्यांत यावी.

मा.महापौर : यांनी सुचना दिल्या की,जे कर्मचारी ज्या मुळ पदावर नेमलेले आहेत त्या पदावर त्यांना काम करण्यांबाबत सुचना देण्यांत याव्यात.

मा.श्री.आगरकर : स्टॅपिंग पॅटर्न झाला पाहिजे व त्याचा आग्रह धरला पाहिजे.सक्षम माणसे भरणे ही काळाची गरज आहे.

## विषय क्रमांक : ५ - श्री.गोरक्ष दरवडे यांचे नेमणुकी बाबत.

मा.श्री.कृ.द.जाधव : - या प्रस्तावा बरोबरच श्री.इथापे यांची केस का घेतली नाही.श्री.इथापे हे कार्यक्षम अधिकारी असतांनाही व केस सारखी असतांनाही श्री.इथापे यांना मानधनावर घेतलेले आहे.श्री.इथापे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष अधिका-यांवर अन्याय नाही काय यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की,रिक्त पदावरच नेमणुकीचा प्रस्ताव ठेवण्यांत आलेला नाही.श्री.इथापे यांच्याकरीता रिक्त पद नाही.
मा.श्री.दिप चव्हाण :- यांनी ऑफिस प्रस्ताव वाचण्यांस सुचविले व सांगितले की,नं.३३ / ९९ रिट पिटीशन सरसकट लागु आहे.श्री.दरवडे यांना तात्पुरती ऑर्डर दिलेली आहे.ऑर्डर बेकायदेशीर आहे.तीन महिन्याकरीता ऑर्डर दिलेली आहे.मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की,मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५१ ऐवजी ५३ (१) चा रिपोर्ट दिलेला आहे.
मा.श्री.दिप चव्हाण : यावर स्थायी समिती ठराव मंजुर.
मा.श्री.आगरकर : महासभेला दुरुस्ती करण्यांचा अधिकार आहे.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट पाहता श्री.दरवडे यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ ( १ ) नुसार लॅब टेक्निशियन या पदावर कायम नेमणुक देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.अभय आगरकर
अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके
ठराव बहुमताने मंजूर.

**<u>विषय क्रमांक : ६ - निवड करण्यांत आलेल्या उमेदवारांची यादी अखेर मंजुरीसाठी.</u>**

मा.श्री.अनंत जोशी :- महानगरपालिकेच्या ठरावाच्या मंजुरीची गरज आहे काय ?
मा.श्री.सुरेश शेळके :- नियमानूसार मंजुर.
ठराव : ऑफिस रिपोर्टानुसार अखेर मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.दिप चव्हाण
अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके
ठराव सर्वानुमते मंजुर.

**<u>विषय क्रमांक ७, ८, नियमानूसार मंजुर</u>**

**<u>विषय क्रमांक ९ -नोंद घेण्यात आली.</u>**

**<u>विषय क्रमांक १०</u>** - डॉ.ना.ज.पाऊलबुध्दे यांचे नांव रस्त्यास देण्याबाबत या बाबत मा.कृ.ज.जाधव यांनी सुचविले की, माजी आमदार कै.डॉ.पाऊलबुध्दे यांचे कार्य मोठे आहे तेव्हा एखाद्या रस्त्यास नांव देऊन त्यांना छोटे करु नये. सबब सदरचा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

**<u>विषय क्रमांक ११ :- नियामानूसार मंजुर करण्यांत येत आहे.</u>**

**<u>विषय क्रमांक १२ :- नोंद घेण्यात आली.</u>**

**<u>विषय क्रमांक ११ :- रजेचे अर्ज मंजुर.</u>**

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : १** **दि. १८ - ३-**
**२००५**

---

**<u>प्रस्तावाचा विषय -</u>** अहमदनगर शहराच्या पाणी पुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा खंडीत करणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वारंवार येत असलेल्या नोटीसांबाबत ऑफिस रिपोर्ट.

**<u>प्रस्तावाचा मजकूर</u> :** अहमदनगर शहराच्या पाणी पुरवठयाच्या उच्चदाब विदयूत संचाचा विज पुरवठा खंडीत करण्याबाबत महाराष्ट्र विद्यूत मंडळाने आज दिनांक ७/३/२००५ रोजी इकडेस नोटीस पत्राव्दारे कळविलेले आहे. (सोबत महा.विद्यूत मंडळाचे नोटीसपत्र) दि.२८/२/२००५ रोजीही महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाने नोटीस देवून अहमदनगर महानगरपालिकेकडे नगर शहराच्या पाणी पुरवठयाचा उच्चदाब विदयूत संचाची दि.३१/१२/२००४ अखेर रुपये १२९४८.६२ लाख थकबाकी भरणेबाबत कार्यवाही करा,अन्यथा वीज पुरवठा खंडीत केला जाईल असे सुचीत केलेले होते.

सदयस्थितीत असलेली थकबाकी ही काही प्रमाणात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाची व काही प्रमाणात तत्कालीन नगरपालिकेची व पर्यायाने आताच्या महानगरपालिकेची आहे.या संदर्भात सर्व मान्य तोडगा काढण्यास्तव मा.शासन स्तरावर वेळोवेळी बैठका आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. व त्याप्रमाणात निर्णयही दिलेले होते. (सोबत बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.) परंतू या बैठकामधून थकबाकीबाबत सर्वमान्य तोडगा न निघाल्याने थकबाकीची रक्कम वाढत गेलेली आहे.

याचाच एक भाग म्हणून दि. १७/२/२००५ रोजी महाराष्ट्र शासनाचे मा.प्रधान सचीव, स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दालनात महाराष्ट्र विद्यूत मंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, व अहमदनगर महानगरपालिका, यांचे प्रतिनिधी समवेत बैठक आयोजीत करण्यात आलेली होती.सदर बैठकीत मा.प्रधान सचीव यांनी महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, यांनी एकत्र बसून थकबाकीचा वाद मिटवून थकबाकी भरण्यासंदर्भात सूचना दिलेल्या होत्या. या सूचनांच्या अनुषंगाने महानगरपालिकेने दि.२४/२/२००५ रोजी व दि. ४/३/२००५ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाचे अधीक्षक अभियंता, व इतर अधिका-यांसमवेत मा.आयुक्त, महानगरपालिका यांचे दालनात बैठक आयोजीत केलेली होती. सदर बैठकीस मा.महापौर व मा.सभापती, स्थायी समिती, हे ही हजर होते.सदर बैठकीत दोन्ही कार्यालयाकडील प्रलंबीत असलेल्या थकबाकीबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

४) अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणेपूर्वीची वीजबीलांची सर्व थकीत रक्कम भरणेची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील.
५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने पूर्वी जी पाणी बीले दिलेली आहेत. त्यांच्या दरात सुधारणा करुन पुन्हा बीलाची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुधारीत करण्यात येईल.
६) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने पूर्वी जी पाणी बीले दिलेली आहेत. त्यात प्रत्यक्ष मिळणारे पाणी व बिलात आकारण्यात आलेले पाणी यातील तफावत दुरुस्त करण्यात येवून बीलाची आकारणी करण्यात येईल.

वरील बैठकीत ठरल्याप्रमाणे अहमदनगर पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यानंतर म्हणजेच १/७/९९ नंतरची वीज बीलांची थकबाकी ही अहमदनगर महानगरपालिकेची राहील.

अहमदनगर महानगरपालिका जुन २००३ पासून वीज बीलाची दरमहाची देयके नियमीतपण

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडे अदा करीत असून ,१/७/९९ ते ३०/५/२००३ या कालावधीतील वीज बीलाची थकीत रक्कम रु.२७,४९,५०,७७०/- एवढी व्याज व विलंब आकार वगळून येत आहे.

मा.शासनाचे निर्णयानुसार सार्वजनिक नळ पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाने त्यांचे दिनांक २१/७/२००४ रोजीचे परिपत्रकाअन्वये जाहीर केलेल्या सार्वजनिक पिण्याच्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या वीज बिलांच्या थकबाकी बाबत सवलत देण्याची ''सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजीवनी'' योजना जाहिर केलेली आहे. मात्र महाराष्ट्र राज्य विदयूत मंडळाने जाहीर केलेली योजना नगरपालिकेसाठी असून त्यात महानगरपालिकांचा समावेश नाही.परंतू दिनांक १७/२/२००५ रोजी मा.प्रधान सचीव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई, यांचे दालनात थकबाकी संदर्भात झालेल्या मिटींगमध्ये मा.प्रधान सचीव साहेबांनी सदर योजना अहमदनगर महानगरपालिकेसाठी लागू राहील, व अहमदनगर महानगरपालिकेने त्याबाबत योग्य तो विचार करावा. असे सांगितलेले आहे.

सार्वजनिक नळ पाणी पुरवठा संजीवनी योजनेबाबत सविस्तर अहवाल ,मा.सर्वसाधारण सभा
(अंदाजपत्रकीय सन २००५-२००६ ) ठेवण्यात आलेला आहे.

येणेप्रमाणे महानगरपालिकेची कार्यवाही चालू आहे. परंतू ही थकबाकी भरणेस्तव महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळाकडून वारंवार मागणी होत असून, थकबाकी न भरल्यास पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल. याबाबतच्या नोटीसा येत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेची विनाकारण बदनामी होत असून नागरीकांत असंतोषाचे वातावरण निर्माण होत आहे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, '' महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे या योजनेनुसार जर अहमदनगर महानगरपालिकेने लाभ घ्यावयाचा ठरविल्यास महानगरपालिकेस मुद्दलाच्या ५०% म्हणजेच रु.१३,७४,७५,३८५/- इतकी रक्कम १० समान हप्त्यात भरणा करावी लागेल. ही रक्कम भरणा केल्यास रु.३१,१०,८१,४०५/- इतकी थकबाकी महानगरपालिकेला माफ होईल. त्यामुळे ही योजना अहमदनगर महानगरपालिकेस अत्यंत लाभदायक आहे.

सन २००५-०६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी रु.५,००,०००/- कर्ज रुपाने उत्पन्न व रु.५,००,०००/- इतकी खर्चाची टोकण तरतूद करणेत आलेली आहे. एकूण रकमेचा विचार करता रु.१३,७४,७५,३८५/- इतकी रक्कम अंदाजपत्रकातून शिल्लक ठेवून योजनेचा लाभ घेणे अशक्य आहे. त्यामुळे अंदाजपत्रकात केवळ टोकण तरतूद केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विद्युत कनेक्शन बंद करण्याबाबत वेळोवेळी पत्र दिले जात आहेत. दिनांक ०९-०३-२००५ रोजी काळी वेळ विद्युत पुरवठा खंडीतही करणेत आला होता. अशा परिस्थितीत या योजनेचा लाभ घेण अवशयक झाले असून लाभ घेणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १० मधील कलम १०९, ११० मध्ये कर्ज उभारणीबाबतचे महानगरपालिकेचे अधिकार नमूद करण्यात आलेले आहेत. या प्रकरणात कर्ज घेणे व परतफेडीबाबत सर्व तरतूदी नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे मुख्य लेखा परिक्षकांचे अभिप्राय नमूद करुन विषय तातडीने महासभेपुढे घेण्यासाठी प्रस्तावित करणे उचित राहील. तरी मुख्य लेखा परिक्षक यांनी आपले अभिप्राय नमूद करुन फेरसादर करावे. ''

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, '' सार्वजनिक नळ पाणीपुरवठा संजीवनी योजनेचा लाभ घेतल्यास महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. तसेच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता एकूण रक्कम रु.१३,७४,७५,३८५/- १० समान हप्त्यामधे भरावयाचे आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण १०९ व ११० प्रमाणे कर्जाऊ रक्कम मा.शासनाच्या पूर्वमंजूरीने प्राप्त करुन घेता येईल.

तसेच सन २००५-२००६ चे अंदाजपत्रकातील तरतुदीमध्ये घेतलेल्या कर्जाची परतफेड करणेकरिता तरतूद करावी लागेल. सबब महानगरपालिका सभेपुढे प्रस्तावीत करुन निर्णय घेणे योग्य.''

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, '' सन ९९ नंतर नगरपालिका/महानगरपालिकेकडे पाणीपुरवठा योजना हस्तांतर झालेनंतरची विद्युत बील बाकी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणे आवश्यक आहे. प्रस्तावित जलसंजीवनी योजनेचा लाभ घेऊन थकीत विद्युत बिलाची रक्कम भरणेचे नियोजन करणेस हरकत नाही.''

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा), मुख्य लेखा परिक्षक व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

मा.श्री.कृ.द.जाधव - खास सभेचा उल्लेख केलेला आहे.नियम काय आहे.सभा कायदेशिर आहे काय ? फक्त खास सभेचे विषयच घ्यावयास पाहिजे.तसेच या सभेत मागील सभेचे कार्यवृत्त त्याचप्रमाणे दुखवटयाचे प्रस्ताव ठेवलेले नाही,त्यामुळे ही सभा बेकायदेशिर आहे असे वाटते.

महापौर - वीज पुरवठा बीला बाबत विशेष सभा घेतलेली आहे. महत्वाचे विषय घेतलेले आहे.सभा कायदेशिर आहे.

चर्चा पुढे चालू.

मा.श्री.त्रिपाठी - वीज बीला बाबतचा प्रश्न ३० वर्षापासुन चालु आहे.घाबरण्यांचे कारण नाही,मंत्रीस्तरावर बैठक घेण्यांत यावी.तत्पुर्वी २० लाख रु.वीजबील दरमहा भरण्यांचे ठरले होते.जीवन प्राधिकरण विभागाकडुन पाणीपुरवठा योजना ताब्यात घेतांना सावेडी भुयारी गटार योजना मार्गी लावण्यांबाबत ठरलेले होते. परंतु झाली नाही.सध्या कर्मचा-यांच्या पगाराला पैशे नसतात सदरचे पैशे भरण्यांसाठी कोठुन आणणांर त्याबाबत कमिटी नेमावी.कमिटी नेमुन त्याबाबतचा निर्णय घेण्यांत यावा.

मा.श्री.नामदेव पवार - युतीच्या काळामध्ये झालेल्या मिटींगचे वेळी थकबाकीचे बील माफ केलेले होते.पेपरमध्ये तसे छापून आले होते. त्याबाबत पत्रव्यवहार केला आहे काय.

त्याबाबत इंजिनिअर श्री.निकम यांनी खुलासा केला.

श्री.निकम - मिटींगचे इतिवृत्त आपल्याकडे आहे.बील माफ केलेले नाही व बजेट तरतूद केलेली नाही.

मा.आयुक्त - बील माफ होण्यांचा प्रश्न नाही.प्रस्तावात स्पष्ट नमूद केले आहे.थकबाकी भरणें आवश्यक आहे.माफ झालेले नाही.

मा.श्री.नामदेव पवार - याबाबतचे पैसे कसे भरणांर काय पर्याय आहे,तरतुद काय आहे व ठराव काय घेणांर.

मा.श्री.दिपक सुळ - दि.१७-२-२००५ रोजी झालेल्या बैठकी प्रमाणे जीवन प्राधिकरणांची जबाबदारी आहे.जीवन प्राधिकरणांने आपली फसवणूक केलेली आहे. व ब-याच अटींची पुर्तता केलेली नाही.

मा.आयुक्त - १९९९ पुर्वीची थकबाकी जीवन प्राधिकरणांने भरावयाची आहे. व त्यानंतरच्या थकबाकी बाबत मनपाची जबाबदारी आहे.

मा.श्री.दिप चव्हाण - शासनाचे डायरेक्शन काय आहे.कर्ज घेवून पैसे भरावे असे आहे काय ? अंतिम महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मंजुर नाही.कार्यवृत्त कायम करण्यांसाठी घेतलेले नाही. ५ लाख टोकन तरतुदीला मंजुरी नाही.बजेट मंजुर नसतांना अंतिम मंजुरी कशी घेणांर कर्ज घेणे योग्य आहे काय ? हा विषय बजेट मिटींग मध्ये का आणलेला नाही.ब-याच नगरपालिकांकडे वीज मंडळाची थकबाकी आहे.याबाबत एमएसईबीने कोणत्याही कोर्टामध्ये दाखल केलेले नाही.रिट पिटीशन फक्त अहमदनगर महानगरपालिकेकडे दाखल झालेला नाही.

कर्ज घेण्यांसाठी तरतुद केलेली नाही.बजेट मंजुर करुन अगोदर घ्यावे.व नंतरच विषय मंजुर करावा.कारण हा विषय बजेटशी निगडीत आहे.दि.१८-२-०५ च्या बजेट मिटींगचे प्रोसिडींग वाचुन दाखववे. परस्पर मंजुर झाले आहे काय त्याचा खुलासा करावा.

हा विषय तहकुब ठेवुन बजेट मंजुर झाल्या नंतरच घ्यावा.

थकबाकी बाबत शासनाने परिपत्रक काढलेले आहे.हायकोर्टाचा निर्णय नाही माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथजी मुंडे यांचा निर्णय डावलला गेला आहे.त्यावेळस ठरलेल्या प्रमाणे दरमहा २० लाख रुपये भरत असतांना त्याचे आपण दरमहा ३० लाख रुपये केलेले आहे.व आता ७० लाख भरीत आहोत म्हणजे एक्स्ट्रॉ ४० लाख रुपये बील भरीत आहोत.

तरी बजेट मंजुर झाल्यानंतर विषय घेण्यांत यावा.

मा.श्री.कृ.द.जाधव - विषय मांडण्याअगोदर खुलासा होणें आवश्यक आहे.की कोणते विषय घ्यावयाचे किंवा कोणते विषय घ्यावयाचे नाहीत याबाबत पार्टीमिटींग मध्ये अगोदरच चर्चा झालेली असते. नंतरच जनरल सभेपुढे सदर विषय येतात.

महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजना ही वेगळी आहे.३२ कि.मि.वरुन पाणी आणावे लागते.२ ते ३ ठिकाणी पाणी लिफ्ट करावे लागते. नैसर्गिक पाणी येत नाही.म्हणुन महानगरपालिकेची स्पेशल केस म्हणुन शासन दरबारी प्रयत्न करावे.व विषय तहकुब न ठेवता शासनांकडे स्पेशल केस पाठवावी.शिष्टमंडळ शासनांकडे पाठवावे व सविस्तर शासन दरबारी प्रस्ताव मांडुन प्रयत्न करावा.व शासनांस आपली बाजु पटवून द्यावी.

मा.आयुक्त - याबाबत मा.प्रधान सचिव यांना माहिती दिलेली आहे. वीज बील भरणे आवश्यक असल्याचे शासनाने सांगितले आहे.

मा.श्री.कृ.द.जाधव - यांनी पुढे सांगितले की,श्री.नामदेव पवार व श्री.कोतकर यांना शासन दरबारी शिष्ट मंडळात घेवुन जावे.

मा.श्री.दिप चव्हाण - पार्टी मिटींग मध्ये विषय ठरले जातात हे म्हणणे बरोबर आहे.तथापि पाटीमिटींग मध्ये एकमेकांची अंडरस्टँडिंग असते.मालेगांव ,नागपुर या ठिकाणी चुकीचे ठराव झाल्यामुळे नगरसेवकांवर कायदेशिर कारवाई झालेली होती.याची माहिती दिलेली आहे.कायद्याचा मुद्या महत्वाचा आहे.

मा.श्री.कैलास गिरवले - याबाबत सर्वपक्षिय झालेलया सभेमध्ये याबाबत जबाबदारी स्वीकारलेली आहे.तरी शासनांकडे प्रस्ताव मांडावा व प्रयत्न करावे.याबाबत शिष्ट मंडळामध्ये श्री.कोतकर श्री.भाऊ जाधव यांची समिती नेमावी.

मा.महापौर - थकबाकी बाबत समिती नेमुन शासनांकडे पाठपुरावा करुन बजेट मंजुर झाल्यानंतर चर्चा करु असे सांगितले.

मा.आयुक्त - विद्युत संजिवनी योजना ३१ मार्च २००५ पर्यंत असल्यामुळे तातडीने हा विषय चर्चेसाठी आणण्यांचे कारण आहे. त्यापुर्वी निर्णय झाला पाहिजे. याबाबतची जबाबदारी यानंतर मनपावर येणांर आहे. व नागरिकांनाही अडचण सोसावी लागणांर आहे.

मा.श्री.दिप चव्हाण -- मनपाने बील थकविलेले नाही.करंट बील भरत आहोत.थकबाकी बाबत वाद आहे.

मा.महापौर - मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सर्व पक्षिय समिती नेमुन याबाबत शासनांकडे पाठपुरावा करण्यांत यावा व तोपर्यंत विषय तहकुब ठेवावा असे सुचविले व बजेट मंजुर झाल्यानंतर विचार करु.

मा.श्री.अशोक कानडे - सदर विषयाबाबत विरोध नोंदवावा.याबाबतचे रुलिंग अध्यक्षांनी विचार करुन द्यावे.कर्ज घेण्यांबाबतचा विषय तहकुब ठेवावा.

मा.श्री.अभय आगरकर - या विषयाबाबतचे रुलिंग बाबत विचार करुन निर्णय द्यावा.एकदा तहकुब केलेला विषय तीन महिने घेता येणांर नाही.

मा.श्री.नामदेव पवार - वीज पुरवठा केंव्हाही खंडित होऊ शकतो तेंव्हा याबाबत काय निर्णय झाला.व्यवस्थित निर्णय घ्यावा.
मा.श्री.आसाराम कावरे - शासनांने कर्ज माफ करावे.पुणे महापालिकेकडुन कर्ज घ्यावे.
मा.आयुक्त - यांनी खुलासा केला सार्वजनिक पाणीपुरवठा जलसंजिवनी योजना ही नगरपालिका करीता मर्यादीत आहे. व ही थकबाकी जी आहे ती नगरपालिकेच्या वेळेची आहे.मा.प्रधान सचिव यांचेकडील मिटींगचे वेळी या योजनेचा फायदा महानगरपालिकेला घेता येईल किंवा कसे याबाबत सांगितले वरुन प्रस्ताव ठेवलेला आहे.व योजनेचा लाभ घेण्यांबाबतचा प्रस्ताव मांडलेला आहे.तेंव्हा या योजनेचा मनपाला लाभ घेता येईल.
मा.श्री.कानडे - यांनी विचारले की याबाबत मनपाकडे लेखी काही माहिती नाही काय ?
यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की,
मा.आयुक्त - विद्युत मंडळाची ही योजना आहे.सक्षम अधिकारी यांनी खुलासा याबाबत केलेला आहे.
मा.श्री.कानडे - मनपाची आर्थिक कोंडी करण्यांचा हा प्रयत्न आहे.जकात अनुदान बंद जिल्हाधिकारी यांनी शिक्षण व रोजगार हमी परस्पर कापुन घेतलेले अनुदान व बजेट मंजुरी नसतांना तेरा कोटी कर्ज घेण्यांचा सल्ला दिला जातो हे आर्थिक दृष्टया योग्य नाही.तरी मी विरोध करतो.प्रस्ताव रद्य करावा.
मा.श्री.सतिष मैड - यांनी जड वाहतुकी बाबतचा प्रश्न मध्ये उपस्थित केला.
मा.श्री.सुरेश शेळके - याबाबत श्री.अशोक बसाक यांचेकडे निर्णय झालेला होता.तरी याबाबत समिती नेमावी अशी विनंती केली.
मा.महापौर - विद्युत पुरवठा खंडित बाबतच्या आलेल्या नोटीसी वरचा प्रस्ताव तहकुब करुन सर्वपक्षिय समितीचे शासनांकडे शिष्ट मंडळ घेवुन जावे असे सुचविले.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : ३** **दि.१८ - ३ - २००५**

---

**प्रस्तावाचा विषय -** अहमदनगर शहर मंजूर विकास योजनेनुसार म.गांधी रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर -** अहमदनगर शहराची विकास योजना शासनाने निर्णय क्र.टीपीएस्/१६७६/८५४ युडी-५ दि.१८-२-१९७८ अन्वये मंजूर केली असून दि.१-४-७८ पासून अंमलात आली आहे. सदर मंजूर विकास योजनेनुसार म.गांधी रस्ता हा ५० फूट दर्शविण्यात आला असून तत्कालीन नगरपरिषदेने विकास योजनेच्या प्रस्तावानुसार सदर रस्ता ५० फूट रुंद करण्याचे योजले आहे. त्यासाठी प्रस्तुत रस्तारुंदीकरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने सोयीस्कर असे १) भिंगारवाला चौक ते घासगल्ली कोपरा २) घासगल्ली कोपरा ते तेलीखुंट ३) तेलीखुंट ते सर्जेपुरा रंगभवन असे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्याचे सन १९८८ मध्ये रुंदीकरण करण्यात आले असून २रा व ३रा टप्पा रस्ता रुंदीकरणाने बाधित होणा-या जमिनीच्या संपादनास नगरपरिषद ठराव क्र.१४४ दि.१९-१०-१९८८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. व प्रस्ताव जा.क्र.टी.पी./भूसंपादन/एम.जी.रोड १२०२ दि.४-७-१९८९ अन्वये मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे सादर करण्यात आलेला असून त्यांनी सदर भूसंपादनकामी त्यांच्याकरीता मा.सहाय्यक संचालक,नगररचना,अहमदनगर यांची नेमणूक केलेली आहे. दरम्यान अहमदनगर शहराच्या १ली सुधारित मंजूर विकास योजनेची मुदत सन १९८८ मध्ये संपल्यानंतर नियमानुसार सर्व कार्यवाही पार पाडून सन १९९९ मध्ये शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या २री सुधारीत विकास योजनेमध्ये विषयांकित म.गांधी रस्ता ५० फूट दर्शविण्यात आलेला असून सदर योजनेस अद्याप शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही.

सदर रस्ता रुंदीकरण प्रकरणी मा.भूसंपादन अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी प्राथमिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचेकडील पत्र क्र.भु.सं./अ.नगर/म.गांधी रस्ता रुंदीकरण/२रा व ३रा टप्पा/ससंअ/१८५ दि.२२-१-०३ अन्वये घासगल्ली ते रंगभवन (२रा व ३रा टप्पा) ५० फूट रुंदीकरणाबाबतचा निवाडा दि.१५-१-२००३ रोजी प्रसिध्द करुन निवाडयाप्रमाणे रक्कम रु.२,४५,३०,०६०/- व आस्थापनेवरील खर्च ३% असे रुपये ७,३५,९०२/- अशी एकूण रक्कम रुपये २,५२,६५,९६२/- भरणेबाबत इकडे कळविले आहे.

त्यावर विषयांकित रिट पिटीशन नं.३१९०/२००२ मध्ये नगरपरिषदेच्या वतीने काम पहाणारे ॲड.श्री.गुगळे यांनी - " सदर प्रकरणाचे गांभिर्य व या प्रकरणी यापूर्वी मे.कोर्टाने दिलेला निर्णय पाहता नगरपरिषदेने न्यायालयाच्या आदेशाची पूर्णत्वाने अंमलबजावणी व्हावी व सदर आदेशाबाबत नगरपरिषदेकडून दिरंगाई अगर टाळाटाळ होत नाही हे दर्शविण्यासाठी सदर प्रकरणातील निवाडयाची रक्कम मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे त्वरीत जमा करणे आवश्यक आहे व त्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक बाबी पूर्ण करणेसाठी ताबडतोब कार्यवाही करणे आवश्यक असलेबाबत " -- दि.१५-१-२००३ च्या पत्राद्वारे मत व्यक्त केले आहे.

ॲड.गुगळे यांचा उपरोक्त अभिप्राय उचित कार्यवाहीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवला असता सर्वसाधारण सभा ठराव क्र.१ दि.५-२-२००३ अन्वये -- " अहमदनगर नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती नव्याने समाविष्ट झालेली १२ अविकसित गावे, उपनगरातील गतीने विकसीत झालेल्या बाजारपेठेमुळे मुळ शहरातील बाजारपेठेचे झालेले विकेंद्रीकरण, विकास कामात आणि अत्यावश्यक मुलभूत नागरी सुविधा देणेकरीता नगरपरिषदेवर पडणारा आर्थिक ताण, मा.सर्वोच्च न्यायालयाचे तज्ञ

ा वकिलांकडून मागविण्यात आलेले मत व अभिप्राय वगैरे बाबीबाबत सर्वसाधारण सभेत व्यक्त करण्यात आलेल्या भावना विचारात घेता २ व ३ टप्प्यातील म.गांधी रस्ता रुंदी सद्यस्थितीस ४० फूट ठेवण्यात येवून ५० फूट रस्ता रुंदीकरणाबाबतच्या अडचणी उच्च न्यायालयात जेष्ठ वकिल नेमून विनंती अर्ज मा.मुख्याधिकारी यांनी करावा. जेष्ठ वकिल नेमण्याचे अधिकार मा.अध्यक्ष व मुख्याधिकारी यांना देण्यात येत आहे. त्याकामी येणा-या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. शासनाकडे प्रलंबित असलेल्या विकास आराखडयामध्ये दुरुस्तीबाबत विनंती करण्यात यावी. '' -- अशाबाबत ठराव पारित करण्यात आला आहे.

अहमदनगर शहराची २री सुधारीत विकास योजना मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेली आहे. त्यामध्ये या रस्त्याची रुंदी ५० फूटी दर्शविण्यात आलेली आहे. विकास योजना शासनाकडे सादर करताना तत्कालीन नगरपरिषदेने या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे हे रस्ता रुंदीकरण होणे उचित वाटते.

रिट पिटीशन ३१९०/२००२ या याचिकेमध्ये उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिलेला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.५ अहमदनगर महानगरपालिकेला असे डायरेक्टीव्ह दिले आहेत की - ''या याचिकेची अंतिम सुनावणी निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्र.५ महानगरपालिकेने ४० फूटच रस्तारुंदी करावी. तत्कालीन नगरपरिषद बरखास्त होऊन आता नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिका झालेली आहे. तेव्हा या महानगरपालिकेने एकतर जुना ठराव क्र.१ दि.५-२-२००३ कायम करावा अथवा नवीन ठराव करुन शासनाकडे पाठवावा व शासनाने त्यावर कार्यवाही करावी. तोपर्यंत ४० फूट रस्त्याचेच काम करावे. तरी या संदर्भात म.गांधी रस्त्याचे रुंदीकरण जून्या ठरावाप्रमाणे ४० फूट ठेवावे किंवा किंवा ५० फूट ठेवावे. अथवा उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य नसून त्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात अपिल करावे याबाबत निर्णयास्तव सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.खास सभेपुढे ठेविला.

<u>**ठराव :**</u> ठरविण्यात येते की,अहमदनगर शहर मंजूर विकास योजने नुसार प्रस्ताव या सभेने पाहिला असून यापूर्वी सदर रस्त्याचे रुंदीकरण (फेज १)चे ज्या पध्दतीने रस्ता ४० फुट ठेवणेकरीता करणेत आले त्यानुसार उर्वरित रस्त्याचे रुंदीकरण देखील ४० फुट रस्ता ठेवणेकरीता करणेत यावे. नियमानुसार उचीत कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.कैलास गिरवले
अनुमोदक : मा.श्री.सतिष मैड
ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : ४** **दि.१८ - ३ - २००५**

---

**<u>प्रस्तावाचा विषय -</u>** मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-२००४ - अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम पाणीपुरवठा व नगररचना विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याची मंजूर पदसंख्या अपुरी असल्याने म.न.पा.चे कामात गतीमानता कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाच्या दृष्टीने आस्थापनेवर जादा (१२) पदे निर्माण करुन त्या जागी प्रति नियुक्तीवर अभियंत्याची पदे भरणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**<u>प्रस्तावाचा मजकूर -</u>** अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर होवून १ वर्षाचा कालावधी होवून गेला असून तत्कालीन नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील कर्मचारीच आज रोजी महानगरपालिकेचे काम पाहत आहेत. सध्याच्या आस्थापनेनुसार खालील प्रमाणे अभियंते कार्यरत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| केडर नं.१ | १. | श्री.एन.जी.मगर | सिव्हील इंजिनिअर |
| | २. | श्री.बी.एम.बडवे | -- " -- |
| | ३. | श्री.पी.जे.निकम | मेकॅनिकल इंजिनिअर |
| | | | |
| केडर नं.२ | १ | श्री.आर.जी.सातपुते | कनिष्ठ अभियंता |
| | २ | श्री.एम.डी.काकडे | -- " -- |
| | ३ | श्री.व्ही.जी.सोनटक्के | -- " -- |
| | ४ | श्री.आर.जी.मेहेत्रे | -- " -- |
| | ५ | श्री.के.वाय.बल्लाळ | -- " -- |

याशिवाय प्रतिनियुक्तीवर नगर रचनाकार श्री.दहे तर शहर अभियंता श्री.आहिरे रुजू झालेले आहेत.

अहमदनगर शहराचा ८८ चौ.कि.मी. इतका विस्तार तसेच एकूण २१ प्रभाग आणि कामांचा ताण विचारात घेता हा तांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे. त्यामुळे खालील प्रमाणे कनिष्ठ अभियंत्यांचा आकृतीबंध प्रस्तावित करत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता ( बांधकाम विभाग ) | ९ पदे | २१ प्रभागांसाठी प्रत्येक ३ प्रभागांना १ = एकूण ७<br>उप शहर अभियंता यांना सहाय्यक = एकुण १<br>शहर अभियंता यांना सहाय्यक = एकुण १ |
| २ | कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा विभाग | ३ पदे | १ पद मुख्य लाईनसाठी<br>२ पदे वितरण व्यवस्थेसाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | कनिष्ठ अभियंता / कृषी अधिकारी आरोग्य विभाग | २ पदे | घनकचरा व्यवस्थापनासाठी |
| ४ | सहायक नगर रचनाकार ( नगर रचना विभाग ) | ३ पदे | २१ प्रभागांचे ३ विभाग ( प्रत्येकी ७ प्रभाग विभागणी करुन. |

महापालिकेत केवळ ५ कनिष्ठ अभियंते कार्यरत आहेत.

वरील प्रमाणे १७ कनिष्ठ अभियंता व कृषी अधिकारी दर्जाचे अधिकारी आवश्यक वाटतात. यासाठी खालील पर्याय सुचविण्यांत येत आहे.

१.एकुण आणखी १२ पदे निर्माण करुन सक्षम मंजूरीने तात्काळ भरतीची कार्यवाही करणें.

२.एकुण जादाची १२ पदे सक्षम मंजूरीने निर्माण करुन घेवून अनुक्रमांक १ साठी ४ सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंते , अनुक्रमांक २ साठी ३ शासनांच्या पाटबंधारे किंवा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभियंते, अनुक्रमांक ३ साठी शासनांच्या आरोग्य विभागाचे कनिष्ठ अभियंते, किंवा बी टेक ( कृषि ) ही शैक्षणिक पात्रता धारण करणांरे अभियंते किंवा शासनांच्या कृषिसेवा वर्ग २ चे अधिकारी अनुक्रमांक ४ साठी ३ सहाय्यक नगर रचनाकार दर्जाचे नगर रचनाकार व मुल्यनिर्धारण विभागाचे अधिकारी, तातपुरते प्रतिनियुक्तीवर घेणें त्यानंतर टप्प्याटप्प्याने भरतीची प्रक्रिया पार पाडणें.

वरील सर्व पदांच्या निर्मितीमुळे आस्थापना खर्चात भर पडणांर असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ नुसार स्थायी समिती व महानगरपालिकेच्या मंजूरीने शासनास प्रस्ताव पाठविणें आवश्यक आहे.तरी त्याप्रमाणे निर्णयासाठी सादर.

यावर मा.उपायुक्त (सामान्य) यांचा शेरा की, ''समक्ष चर्चेनुसार वरीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे. निर्णयासाठी शिफारस आहे.''

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, ''उपरोक्त कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन केले. महानगरपालिकेचे बांधकाम (पवडी) पाणीपुरवठा व नगररचना विभागात अभियंत्याची मंजूर पदसंख्या कमी व अपुरी आहे. मनपाचे कामात गतिमानता,कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाचे दृष्टीने बांधकाम (पवडी) मध्ये शासनाचे सार्व.बांध.विभागाकडून अनुभवी व कार्यक्षम ४ कनिष्ठ अभियंते,पाणी पुरवठा विभागात म.जि.प्र.कडून ३ अनुभवी व कार्यक्षम आणि नगररचना विभागात कुशल ३ स.न.र. संचालक, नगररचनाकडून मंजूर वेतनश्रेणीमध्ये प्रतिनियुक्तीवर घेणेस मान्यता देणेस हरकत नाही. सदरचे पदांना तात्पुरती पदनिर्मिती " Stop gap arrangement " म्हणून मान्यता देऊन शासनाचे मान्यतेस सादर करणे संयुक्तीक वाटते.''

यावर मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-२००४ की, '' अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम पाणीपुरवठा व नगररचना विभागात कार्यरत असलेल्या अभियंत्याची मंजूर पद संख्या अपुरी पडत असल्याने महानगरपालिकेचे कामात गतीमानता कार्यक्षमता आणि परिणामकारक प्रशासनाच्या दृष्टीने अहमदनगर महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवर १) बांधकाम विभागाकरीता चार कनिष्ठ अभियंत्याची पदे २) पाणीपुरवठा विभागाकरीता तीन कनिष्ठ अभियंत्याची पदे ३) आरोग्य विभागाकरीता (कृषी अधिकारी) कनिष्ठ अभियंत्याची दोन पदे व ४) नगररचना विभागाकरीता सहाय्यक नगररचनाकार यांची तीन पदे याप्रमाणे एकूण बारा पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर पदावर अ.नं.एक साठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे चार कनिष्ठ अभियंते अ.नं.२ साठी शासनाच्या पाटबंधारे किंवा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे तीन अभियंते अ.नं.तीन साठी शासनाच्या आरोग्य विभागाचे कनिष्ठ अभियंते किंवा बी.टेक.(कृषी) ही शैक्षणीक पात्रता धारण करणारे अभियंते किंवा शासनाच्या कृषी सेवा वर्ग २ चे अधिकारी व अ.नं.चार करीता सहाय्यक

नगररचनाकार दर्जाचे व मुल्यनिर्धारण विभागाचे अधिकारी तात्पुरते प्रतिनियुक्तीवर घेण्यास व त्यानंतर टप्प्याटप्प्याने याजागी कायम भरतीची प्रक्रिया पार पाडणेस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेमध्ये चीफ अकौन्टंन्ट ॲण्ड फायनान्स ऑफिसर चे पद निर्माण करण्यास व सदर जागी प्रतिनियुक्तीवर तात्पुरती नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठरावास मा.श्री.जाधव कृ.द., मा.श्री.कोतकर भा.ए., मा.श्री.पवार ना.शा., मा.श्री. जगताप नि.वि., मा.श्री.शेख सु.लि. सदस्य स्थायी समिती यांचा विरोध. ''

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.स्थायी समितीचे ठरावासह मा.खास सभेपुढे ठेविला.

**<u>ठराव :</u>** ठरविण्यात येते की,महानगरपालिका अस्तित्वात आल्याने कार्यक्षेत्रातील जबाबदारी वाढली असून नागरी सुविधा देण्याचे दृष्टीने व प्रस्तावात नमूद केलेल्या आवश्यकतेचा विचार करता मा.स्थायी समिती ठराव क्र.९ दि.२९-११-०४ अन्वये पुढील पदे प्रतिनियुक्तीवर भरणेबाबत प्रस्ताव मान्यतेसाठी मा.शासनाकडे पाठविणेत यावा. १) अभियंता = पदे १२, २) मुख्य लेखा व वित्त अधिकारी = पद १.

ठराव सर्वानुमते मंजूर.तद्नुषंगीक खर्च मंजूर.

सुचक : मा.श्री.अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री.नामदेव पवार

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : १२** **दि.१८ - ३ - २००५**

**प्रस्तावाचा विषय -** सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना पुर्नसर्वेक्षणाची पूर्वतयारी करणेबाबतचा महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा आदेश माहितीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर :** मा.शासनाच्या आदेशान्वये नागरी भागात राबविण्यात येत असलेली केंद्र शासन पुरस्कृत सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना दि.१-१२-१९९७ पासून सुरु करण्यात आलेली आहे. शहरी भागातील दारिद्र रेषेची भावपातळी दरमहा दरडोई रुपये ५९१.७५ पैसे इतकी केंद्रशासनाकडून निश्चित करण्यात आलेली आहे. यानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये पुर्नसर्वेक्षण करावयाचे प्रस्तावित आहे. राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा मध्ये सर्वेक्षणाचे काम दि.३१ मे २००५ पुर्वी पूर्ण करावयाचे आहे. असा आदेश महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी आदेश क्रमांक : नपप्रसं/१४/ सर्वेक्षण/ २००३/२६४ मुंबई - ३० दि.२५ ऑक्टोबर २००४ अन्वये दिलेला आहे.

वरील आदेशातील मुद्दा क्रमांक २ प्रमाणे महानगरपालिका हद्दीतील घोषित / अघोषित झोपडपट्ट्या शहरातील जुने गांवठाण व कमी उत्पन्न गटांच्या वस्त्यामध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावयाचे आहे. व या व्यतिरिक्त असलेल्या भागामध्ये पुरेशी पुर्व प्रसिध्दी देऊन सर्वेक्षण करावयाचे आहे. या क्षेत्रातील कुटुंबे दारिद्र रेषेखालील असल्याबाबतचा अर्ज महानगरपालिकेकडे सादर करतील. त्यानंतर प्रत्यक्ष भेट देऊन प्रगणक प्रपत्र भरुन घेतील असे आदेशित केलेले आहे.

मुद्दा क्रमांक ३ प्रमाणे पुर्नसर्वेक्षण करुन घेण्याची जबाबदारी जिल्हा नागरी विकास यंत्रणेची आहे.

मुद्दा क्रमांक ३ ब प्रमाणे महानगरपालिकेचे सुजयो योजनेचे कामकाज पाहाणारे उपायुक्त हे "सर्वेक्षण अधिकारी" म्हणून राहतील असे कळविले आहे. शहरातील सर्वेक्षणाची जबाबदारी संपूर्णपणे सर्वेक्षण अधिकारी यांची असेल. सर्वेक्षण अधिका-याने पुढील ३० दिवसात शहराच्या कोणकोणत्या भागामध्ये सर्वेक्षण करावयाचे आहे. आणि त्यात किती कुटुंबाचे सर्वेक्षण करावयाचे आहे. हयाबाबत अंदाज घ्यावा असे सुचित केलेले आहे. यामध्ये कुठलीही वस्ती वगळली जाणार नाही याबाबत दक्षता घेणेबाबत कळविले आहे. सर्वेक्षणाकरीता २००१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार लोकसंख्या गृहीत धरण्यात येऊन त्यामध्ये १०% वाढ गृहीत धरण्यात यावी, असे कळविले आहे.

मुद्दा क्रमांक ३ क प्रमाणे सर्वेक्षण अधिकारी यांनी एक ते दिड लाख लोकसंख्येसाठी एका क्षेत्रीय अधिका-याची नेमणूक करणेबाबत व हा अधिकारी महानगरपालिकेतील वॉर्ड ऑफिसर दर्जाचा असावा, असे आदेशित केलेले आहे.

वर उल्लेख केलेल्या आदेशासोबत परिशिष्ट १मध्ये नागरी भागातील दारिद्र रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्याबाबतचा प्रस्तावीत तपशिलवार कार्यक्रम यासोबत जोडलेला आहे.

परिशिष्ट - १ च्या प्रस्तावीत सर्वेक्षण कार्यक्रमानुसार सर्वेक्षण प्रपत्र भरण्याचा कार्यक्रम १५ एप्रिल २००५ ते १५ मे २००५ पर्यंतचा असून ३१ मे २००५ पर्यंत सर्वेक्षणाचे काम पुर्ण करुन राज्य नागरी विकास यंत्रणेस जिल्हानिहाय अंतिम अहवाल सादर करावयाचा आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने सदरचे सर्वेक्षण करणेकरीता योजनेचे कामकाज पाहणारे उपायुक्त श्री.एस.एल.लहाने यांची सर्वेक्षण अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. तसेच सदर

सर्वेक्षणकामी क्षेत्रीय अधिकारी म्हणून १) श्री.आर.एम.ढाकणे - लेबर कम पर्सोनल ऑफिसर, २) श्री.आर.ए.देशमुख - सहाय्यक आयुक्त सावेडी विभाग ३) श्रीमती.निलीमा बंडेलू - प्रसिध्दी अधिकारी यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

येणे प्रमाणे सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना पुर्नसर्वेक्षणाची पुर्वतयारी करणेबाबतचा महाराष्ट्र राज्य नागरी विकास यंत्रणा नगरपरिषद प्रशासन संचालनालयचा आदेश मा.खास सभेपुढे माहितीस्तव ठेविला.

**ठराव :** नोंद घेण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.अभय आगरकर

अनुमोदक : मा.श्री.सुरेश शेळके

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १३ दिनांक : १८-३-२००५.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

<u>प्रस्तावाचा विषय :</u> मा.सदस्यांचे रजेचे अर्ज.

--÷--

<u>प्रस्तावाचा मजकूर :</u> खालील मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज मा.खास सभेपुढे ठेविले.

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव | सभा रजेची तारीख |
|---|---|---|
| १ | मा.सौ.सत्रे योगिता रंजित | १८-३-२००५ |
| २ | मा.सौ .गंगेकर अंजना राजु | १८-३-२००५ |
| ३ | मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब | १८-३-२००५ |
| ४ | मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश | १८-३-२००५ |
| ५ | मा.सौ.शिंदे कांताबाई अरुण | १८-३-२००५ |
| ६ | मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय | १८-३-२००५ |
| ७ | मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ | १८-३-२००५ |

****

ठराव : रजेचे अर्ज मंजूर.
नोंद घेण्यांत येत आहे.

सही /-.
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

खरी नक्कल,

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.